रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३३२
www.ramprahar.com
मंगळवार, २० जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## गद्दारी आम्ही नाही, तर तुम्ही केली –मुख्यमंत्री शिंदे



**मुंबई :** शिवसेनेचा वर्धापन दिन सोहळा सोमवारी (दि. १९) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईत झाला. या वेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर शरसंधान साधले. गद्दारी आम्ही नाही, तर तुम्ही केली. फक्त गद्दारीची तारीख बदलली, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी ठाकरेंवर पलटवार केला. ते पुढे म्हणाले की, शिवसेनेसाठी आम्ही खस्ता खाल्ल्या, कार्यकर्ता ते मंत्री होताना अनेक केसेस अंगावर घेतल्या. बाळासाहेबांच्या विचारांनी पेटून आमच्यासारख्या अनेक शिवसैनिकांनी शिवसेना वाढवली, तर मुख्यमंत्री असताना केवळ दोन दिवसच तुम्ही घराबाहेर पडलात, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या कार्यपद्धतीवर टीकास्त्र सोडले.

अंतरंग
महाराष्ट्रातील खरे गद्दार उद्धव ठाकरेच -उपमुख्यमंत्री/२
रेवदंड्याच्या सरपंच मनीषा चुनेकरांचे निलंबन कायम/५
भवानी देवीने इतिहास रचला; आशियाई स्पर्धेत पदक/८

# जी-20 समिट : खारघरमध्ये आज रन फॉर एज्युकेशन रॅली


## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, पालकमंत्री उदय सामंत, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या जी-२० समिट अध्यक्षपदामध्ये लोकांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यभरातील आठ विभागांत एफएलएन संकल्पनेवर आधारित रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मंगळवारी (दि. २०) मुंबई विभागाच्या रन फॉर एज्युकेशन रॅलीचे आयोजन खारघर येथे करण्यात आले आहे.







खारघर सेक्टर १९मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून सकाळी ७ वाजता सुरू होणाऱ्या या भव्य रॅलीच्या उद्घाटन सोहळ्याला राज्याचे शालेय शिक्षण व क्रीडामंत्री दीपक केसरकर, उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी डॉ. किरण पाटील, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख आदी मान्यवर तसेच अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

लोकसहभागातून हा कार्यक्रम कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने शिक्षण मंत्रालय भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली वसुधैव कुटुंबकम या ब्रीदवाक्यास अनुसरून Foundational Literacy Numeracy (FLN) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हा विषय केंद्रस्थानी ठेवून या विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, पालक, संपूर्ण समुदाय आणि लोकांमध्ये अभिमानाची भावना निर्माण करण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही नियोजित रॅली दोन किलोमीटरची असून त्यात विविध शाळांमधील दोन हजार विद्यार्थी व शिक्षक सहभागी होऊन पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या विषयी विविध संदेशाद्वारे जनजागृती करणार आहेत.

---

# उद्धवजी, मणिपूर सोडा! तुम्ही मुंबईच्या मालवणीत तरी गेला होता का?

**भाजपचा सवाल**

**मुंबई : प्रतिनिधी**

वरळीतील एका शिबिराला संबोधित करताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्रातील मोदी सरकार आणि भाजपवर टीका केली होती. या टीकेचा भाजप नेत्यांकडून समाचार घेतला जात आहे. 'उद्धव ठाकरे सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सल्ले देत आहेत. अमेरिकेला काय जाता मणिपूरला जा... मी तुम्हाला विचारतो मणिपूर सोडा, तुम्ही आधी मुंबईच्या मालवणीत तरी गेला होता काय,' असा सवाल भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी केला आहे.

भाजप महिला मोर्चाच्या दादर येथे आयोजित सहकार संस्था प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना



आमदार आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेला जोरदार उत्तर दिले. स्वतः घरातून बाहेर पडायचे नाही, पडला तर थेट विमानातून लंडनला जायचे. तिथून मुंबईकरांची चिंता करायची म्हणजे काय? तर काहीच करायचे नाही आणि मोदीजींना सल्ला द्यायला निघाले, अशा शब्दांत आमदार शेलार यांनी पलटवार केला.

तुम्हाला मुंबईच्या मालवणीत जायला जमत नाही. त्यामुळे तुम्ही पंतप्रधान मोदींना सल्ला देऊ नका. भाजप मणिपूर तर शांत करून दाखवेलच. याशिवाय मालवणीमध्ये वळवळ करणारी हिरवी चळवळसुद्धा भारतीय जनता पक्षच शांत करेल, उद्धवजी तुमच्या गटात तो दम नाही, असा जोरदार टोला शेलार यांनी लगावला, तर सहकाराचे काम करताना एकमेकांच्या सहकारणी बना, पण राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्या म्हणून सांगतो विरोधकांनी विपर्यास प्रचार केल्यास रणरागिणीपण बना. अशावेळी तुम्हाला रणरागिणी बनावेच लागेल, कारण खोटे बोलणाऱ्यांचे पीक वाढले आहे, असेही ते म्हणाले.

दरम्यान, काळे म्हटले की सफेद का नाही असे विचारायचे, सफेद म्हटले की पिवळे का नाही, असे विचारायचे आणि पिवळा म्हटल्यावर लाल का नाही? असे विचारायचे हे उद्योग सुरू आहेत. म्हणून आजूबाजूला विरोधकांचा जो खोटा प्रचार सुरू आहे त्याकडेही लक्ष द्यावे लागेल, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार गेल्या नऊ वर्षांत महिलांसाठी संवेदनशीलपणे कसे काम करते आहे याचा सविस्तर उहापोह आमदार शेलार यांनी आपल्या भाषणात केला.

# अंबादास दानवेंचे विरोधी पक्षनेतेपद धोक्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषद आमदार मनीषा कायंदे यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे ठाकरे गटाच्या अडचणी वाढू शकतात. ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांचे विधान परिषद विरोधी पक्षनेतेपद धोक्यात आले आहे. ठाकरे गटाच्या विधान परिषदेतील जागांचीही संख्या कमी होत असल्याने या विरोधी पक्षनेतेपदावर राष्ट्रवादी काँग्रेस दावा करणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ठाकरे गटाच्या विधान परिषद आमदार मनीषा कायंदे यांनी रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. ठाण्यातील आनंदाश्रम येथे हा कार्यक्रम झाला. मुख्यमंत्री शिंदे यांनी कायंदे यांची सचिवपदी नियुक्ती केली आहे.

आधी विप्लव बजौरिया आणि आता मनीषा कायंदे यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे ठाकरे

## मनीषा कायंदेंच्या पक्षप्रवेशामुळे विधान परिषदेतील समीकरणे बदलली






गटाच्या जागा कमी झाल्या आहेत. विधान परिषदेत ठाकरे गटाच्या आमदारांची संख्या नऊ झाली आहे, तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची संख्यादेखील नऊ आहे. सध्या ठाकरे गटाचे अंबादास दानवे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आहेत. जर राष्ट्रवादीने दावा केला, तर त्यांचे पद जाऊ शकते. इतकेच नव्हे; तर आठ जागा असलेली काँग्रेसदेखील अपक्षांच्या मदतीने विरोधी पक्षनेतेपदावर दावा ठोकू शकते.

### अजित पवारांचे सूचक वक्तव्य

आमदार मनीषा कायंदे यांच्या शिवसेना पक्षप्रवेशामुळे ठाकरे गटाचे विधान परिषदेतील संख्याबळ कमी झाले आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना, आता राष्ट्रवादी पक्ष विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदावर दावा करणार का, असा प्रश्न केला. यावर अजित पवारांनी स्मितहास्य करीत तुम्ही हे आमच्या लक्षात आणून दिल्यामुळे आम्ही निश्चितपणे यावर विचार करू, असे उत्तर दिले.

---

## निवडक

### रॉ संस्थेच्या प्रमुखपदी रवी सिन्हा यांची नियुक्ती


**नवी दिल्ली :** देशाची गुप्तचर संस्था अर्थात



'रॉ'चे प्रमुख म्हणून रवी सिन्हा यांच्या नियुक्तीला केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे छत्तीसगड कॅडरचे १९८८च्या बॅचचे आयपीएस अधिकारी सिन्हा हे नवे रॉ प्रमुख असतील. ते सध्या कॅबिनेट सचिवालयात विशेष सचिव म्हणून कार्यरत असून सामंत कुमार गोयल ३० जूनला निवृत्त झाल्यानंतर त्यांची जागा घेतील.

### गोरखपूरच्या गीता प्रेसला महात्मा गांधी शांतता पुरस्कार

**नवी दिल्ली :** गोरखपूरच्या गीता प्रेसला



महात्मा गांधी शांतता पुरस्कार २०२१ने सन्मानित करण्यात आले. गीता प्रेस १०० वर्षे जुनी असून पुरस्काराबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केले. एक कोटी रुपये, सन्मानपत्र, प्रशस्तीपत्रक आणि उत्कृष्ट पारंपारिक हस्तकला/हातमाग वस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# रायगड जिल्ह्यातील धरणांमध्ये केवळ २३ टक्के पाणीसाठा शिल्लक



**अलिबाग : प्रतिनिधी**

जून महिन्याचा तिसरा आठवडा संपत आला, तरीही पावसाचा पत्ता नसल्यामुळे रायगड जिल्ह्यात धरणांमधील पाणीसाठा कमी होऊ लागला आहे. जिल्ह्यातील धरणांमध्ये केवळ २३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. जिल्ह्यातील धरणांनी तळ गाठल्याने पाणीटंचाईचा फटका नागरिकांना बसत आहे.

वाढत्या तापमानामुळे धरणांमधील पाण्याचा साठा कमी झाला आहे. बिपरजॉय चक्रीवादळामुळे पाऊस आणखी उशिरा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. कोलाड येथील रायगड पाटबंधारे विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार एप्रिल महिन्यात ६८.२६१ दशलक्ष घनमीटर एवढा जलसाठा जिल्ह्यातील २८ धरणांमध्ये होता. जूनमध्ये दुसऱ्या आठवड्यापर्यंत सरासरी २४.३३ दशलक्ष घनमीटर इतकाच जलसाठा शिल्लक राहिला आहे. जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १८ धरणांमध्ये एक ते ३० टक्के, पाच धरणांमध्ये ३१ ते ५० टक्के, दोन धरणांमध्ये एकही टक्का पाणी शिल्लक नाही, तर अन्य तीन धरणांमध्ये ५१ ते ७५ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे.

जिल्ह्यातील धरणांनी तळ गाठल्याने पाणीटंचाईचा फटका जिल्ह्यातील नागरिकांना बसत आहे. धरणांतील पाणीसाठी २३ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे या धरणातील पाण्यावर अवलंबून असलेल्या शहरांना पाणी पुरवणे मुश्किल होऊन बसले आहे. महाडसारख्या शहराला पाणी पुरवणाऱ्या दोन्ही धरणांनी तळ गाठल्याने तेथे टँकरने पाणी पुरवावे लागत आहे.

**जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा (टक्क्यांमध्ये)**

फणसाड २, वाव ४०, सुतारवाडी ३३, आंबेघर ७३, श्रीगाव १, कोंडगाव २३, घोटवडे १४, ढोकशेत ९, कवेळे २५, उन्हेरे ४१, कार्ले २८, कुडकी २३, रानिवली २, पाभरे ६३, संदेरी ३४, वरंध ४९, खिंडवाडी २३, कोथुर्डे ००, खैरे ११, साळोख २२, अवसरे १२, भिलवले १९, कलोते-मोकाशी २८, डोणवत ००, मोरबे २४, बामणोली ७, उसरण ६८, पुनाडे २५.

# 'रोहा डायकेम'मधील दुर्घटनाग्रस्त कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रोहा डायकेम कंपनीत ७ जून रोजी गोदामाला लागलेली भीषण आग व त्यामुळे झालेल्या स्फोटात प्रयाग हशा डोलकर (रा. खारापटी, वय ३२) हा कामगार गंभीररित्या जखमी झाला होता. ऐरोली येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला आहे.



रोहा डायकेम कंपनीत झालेल्या दुर्घटनेत प्रयाग डोलकर हा तरुण गंभीररित्या भाजला होता. ऐरोली येथील नॅशनल बर्न हॉस्पिटलमध्ये गेले १२ दिवस तो मृत्यूशी झुंज देत होता. अखेर रविवारी सायंकाळी त्याची प्राणज्योत मालवली. त्यामुळे धाटाव एमआयडीसीतील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

धाटाव एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये आगीच्या व अपघाताच्या घटना नव्या नाहीत. या दुर्घटनांमध्ये अनेक कामगार आतापर्यंत मृत्युमुखी पडले आहेत. कामगारांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ कधी बंद होणार, असा सवाल आता व्यक्त होत आहे. त्याचप्रमाणे प्रयाग डोलकर व त्याच्या कुटुंबाला किती न्याय मिळतो हेदेखील पाहणे महत्त्वाचे आहे.

दरम्यान, कंपनी व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे एका निष्पाप कामगाराचा जीव गेला असून या कामगाराच्या परिवाराच्या पाठिशी आम्ही सदैव उभे राहू. कंपनीने प्रयाग डोलकरच्या परिवाराला भरपाई दिली पाहिजे तसेच कंपनीतील संबंधितांवर तत्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस राजेश डाके यांनी केली आहे.

धाटाव एमआयडीसीतील कामगार व आजूबाजूला राहणाऱ्या लोकांच्या दृष्टीने सुरक्षेविषयीचा मुद्दा आगामी अधिवेशनात उपस्थित करू, असे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

> **रोहा डायकेम कंपनीत ७ जून रोजी झालेल्या दुर्घटनेतील जखमी कामगाराचा रविवारी दुर्दैवी मृत्यू झाला. त्याला जबाबदार म्हणून कंपनीची पूर्णपणे चौकशी केली जाईल आणि पुढच्या काही दिवसांत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल**
> **–केशव केंद्रे, फॅक्टरी इन्स्पेक्टर, धाटाव एमआयडीसी**

---

# आंतरराष्ट्रीय योगदिनी विधानभवन प्रांगणात योगासनांची प्रात्यक्षिके

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनी बुधवारी (दि. २१) विधानभवनाच्या प्रांगणात योगासन प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे.

२१ जून रोजी होणारा हा कार्यक्रम विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांची प्रमुख उपस्थिती तसेच विशेष निमंत्रित म्हणून सर्व मंत्री, विधान



परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे विधिमंडळ सदस्यांसह सुमारे दोन हजार योगप्रेमी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ७ ते ९ या वेळेत योगप्रभात विधानभवन हा कार्यक्रम होईल.

योगविद्या आणि ध्यानधारणा ही भारतीय संस्कृतीकडून अखिल विश्वाला लाभलेली अनमोल देणगी आहे. २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात येणे ही सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद अशी घटना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार जगातील सर्व देशांमध्ये या दिवशी सामुदायिक योगासनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि आरोग्यसंपन्न जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याच पार्श्वभूमीवर यंदा मुंबईतील विधानभवन येथे आयोजित करण्यात आल्याचे विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी स्पष्ट केले. अधिकाधिक सदस्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## महिलेची प्रियकराने रिक्षात केली हत्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या साकीनाका परिसरात ३० वर्षीय महिलेची तिच्या प्रियकराने ऑटोरिक्षात हत्या केली. या वेळी आरोपीने स्वतःवरही वार करीत आत्महत्येचा प्रयत्न केला.

महिला व प्रियकर दोघेही रिक्षातून प्रवास करीत होते. महिलेसोबत असलेल्या वादातून आरोपीने तिचा रिक्षातच गळा चिरून हत्या केली. या वेळी आरोपीने स्वतःवर वार करीत आत्महत्येचा प्रयत्न केला, मात्र वेळेत त्याला रुग्णालयात दाखल केल्याने त्याचा जीव वाचला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



**पनवेल : भाजपचे रायगड जिल्हा विस्तारक अविनाश कोळी यांना वाढदिवसानिमित्त पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक साळुंखे उपस्थित होते. (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)**

# महाराष्ट्रातील खरे गद्दार उद्धव ठाकरेच

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घणाघाती टीका

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याणमध्ये सोमवारी (दि. १९) झालेल्या भाजपाच्या मेळाव्यात भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका केली. खरे गद्दार तुम्हीच आहात, आमच्यासह निवडून आलात आणि खुर्चीसाठी गद्दारी केलीत. तुम्हाला इतर कुणालाही गद्दार म्हणायचा अधिकार नाही, असा हल्लाबोल फडणवीस यांनी केला.

सत्ता कशी असते? खुर्ची कशी असते? उद्धव ठाकरे म्हणाले तुम्ही आम्हाला लोटले. आम्ही त्यांना लोटले नाही. ती खुर्ची तुम्हाला आ जा आ जा म्हणत होती. त्या खुर्चीकडे पाहून तुम्हीही आ रहाँ हूँ म्हणत होते. भाजप आणि शिवसेनेच्या युतीला पूर्ण बहुमत महाराष्ट्राने दिले. त्या वेळी तुम्ही मते मागत असताना भारतीय जनता पक्षासह मते मागितली होती. हिंदुत्वासाठी, महाराष्ट्रात युतीच्या सरकारसाठी मते मागितली होती, मात्र निवडणूक झाली आणि नियत बदलली. खुर्चीसाठी विचारांचा सौदा झाला, असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात गद्दारी कुणी केली असेल तर उद्धव ठाकरे ती गद्दारी तुम्ही केली. आमच्यासोबत, आमच्याबरोबर निवडून आलात आणि आमच्या पाठीत खंजीर खुपसून आमच्याशी गद्दारी केली. खुर्चीसाठी आणि मुख्यमंत्रिपदासाठी तुम्ही काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत गेलात. गद्दार हे जर महाराष्ट्रात कुणाला म्हणायचे असेल तर पहिली गद्दारी उद्धव ठाकरेंनी केली आहे. खरे गद्दार तुम्हीच आहात, दुसऱ्याला गद्दार म्हणण्याचा तुम्हाला अधिकार नाही, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सुनावले.



ते पुढे म्हणाले की, एकनाथ शिंदे आमच्यासोबत आले, ज्यांच्यासोबत मते मागितली त्यांच्यासोबत ते परत आले. ज्या विचारांसाठी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या ४० लोकांना निवडून दिले होते त्यासाठी ते सोबत आले. या ४० लोकांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत मते मागितली नव्हती. या सगळ्यांनी भाजपसोबत मते मागितली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे फोटो लावून तुम्ही मते मागितली. निवडणुकीनंतर तुम्ही (उद्धव ठाकरे) गद्दारी केली. तुम्हाला दुसऱ्याला गद्दार म्हणण्याचा अधिकार नाही. आज यांची अवस्था अशी आहे की, जसे संताजी धनाजी यांची जशी दहशत होती की, मुघलांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी संताजी आणि धनाजीच दिसायचे. रात्री झोपेतून दचकून मुघल उठायचे अशी दहशत होती. आता पंतप्रधान मोदींचे आणि अमित शाह यांचे नाव घेतले की अशीच अवस्था उद्धव ठाकरे आणि काँग्रेस–राष्ट्रवादीवाल्यांची होते आहे.



### घोटाळ्याचा प्रत्येक पैसा परत आणणार

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात मुंबई महापालिकेत साडेबारा हजार कोटींचा घोटाळा झाला. त्यांच्या तिजोरीत गेलेला प्रत्येक पैसे आमचे सरकार परत आणेल. आम्ही उद्धव ठाकरेंचा पर्दाफाश करायचे ठरवले आहे. आजच मुंबई महापालिकेबाबतचा 'कॅग'चा अहवाल समोर आलाय. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये मुंबई महापालिकेत मोठा घोटाळा झाला, असे कॅगच्या अहवालातून समोर आले आहे. त्यामुळे आजच एकनाथ शिंदेंनी यावर 'एसआयटी' स्थापन केली आहे. या 'एसआयटी'च्या माध्यमातून जो जनतेचा पैसा तुम्ही (उद्धव ठाकरे) तुमच्या तिजोरीत नेलाय, त्यातील प्रत्येक पैसा परत आणण्याचे काम आमचे सरकार निश्चितपणे करेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केल.

# खालापूर नगरपंचायत प्रारुप विकास आराखड्याबाबत ग्रामस्थ अनभिज्ञ

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत खालापूरचा प्रारुप विकास आराखडा तयार झाला असून ग्रामस्थांच्या सूचना व हरकतींसाठी ३० दिवसांची मुदत ठेवण्यात आली आहे, परंतु ग्रामस्थ याबाबत अनभिज्ञ असल्याचे म्हटले जात आहे.

खालापूर नगरपंचायतीची स्थापना होऊन सात वर्षांचा कालावधी पूर्ण होत आहे. कोरोना काळामुळे खालापूरचा विकास आराखडा दोन वर्षे रखडला होता. सर्व सुरळीत झाल्यानंतर विकास आराखडा तयार करण्याच्या कामाला वेग आला. १४ सप्टेंबर २०२२मध्ये कच्चा विकास आराखडा तयार करून त्याबाबत खालापूर तहसील येथील नेताजी पालकर सभागृहात बैठक घेण्यात आली होती, परंतु त्यावेळीदेखील बैठकीची पूर्वकल्पना शेतकरी, स्थानिक नागरिक तसेच लोकप्रतिनिधींनादेखील नसल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

विकास आराखडा कसा असेल त्याबाबत सविस्तर माहिती मिळावी यासाठी कार्यशाळा घेऊ, असे आश्वासन प्रभारी मुख्याधिकारी अनुप दूरे यांनी दिले होते, परंतु कार्यशाळा आश्वासन बैठकीपुरते राहिले होते. २ जून २०२३ रोजी वृत्तपत्रात प्रारुप विकास आराखड्याबाबत सूचना प्रसिद्ध करण्यात आल्यावर ३० दिवसांची मुदत सूचना व हरकतींसाठी ठेवण्यात आली आहे. प्रारुप विकास आराखडा नकाशा नगरपंचायत कार्यालय कार्यालयीन वेळेत उपलब्ध होणार असला, तरी खालापूरातील बहुसंख्य ग्रामस्थांना याबाबत माहिती नसल्याचे समोर आले आहे.

खालापूर नगरपंचायत रचना पाहता आदिवासी वाडी, गावापर्यंत वृत्तपत्रात प्रसिद्ध सूचनेबाबत माहिती पोहोचली नाही. ग्रामस्थांमध्ये जनजागृती होण्यासाठी रिक्षातून दवंडी, माहिती फलक लावणे आवश्यक असताना त्याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. त्याचा परिणाम विकास आराखड्यापासून खालापूरकर अनभिज्ञ राहिले आहेत.

> **मागील वेळेसारखी ग्रामस्थांची बैठक घेऊन त्याबाबत माहिती दिली असती, तर विकास आराखडा सर्वसामावेशक वाटला असता. वृत्तपत्रात प्रसिद्ध सूचना खालापूर शहरातील नागरिकांनादेखील माहिती नाही. खालापूरचा विकास करताना व्यापक प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक होते.**
> **–वैभव भोईर, खालापूर युवा विकास मंच**

> **वृत्तपत्रातून याबाबत प्रसिद्धी देण्यात आली आहे. शिवाय कार्यालयात हरकतीसाठी अर्जदेखील उपलब्ध आहेत. विकास आराखडा नकाशादेखील कार्यालयात उपलब्ध करण्यात आला आहे.**
> **–देवेंद्र मोरखंडीकर, नगर अभियंता, खालापूर नगरपंचायत**

# उद्धव ठाकरे यांच्या तोंडी मुस्लिम लीगची भाषा

## ■ भाजप प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी समान नागरी कायद्यामुळे हिंदूंना त्रास होणार असल्याचे सांगितले असून त्यांचे हे वक्तव्य घटना समितीत समान नागरी कायद्याच्या मार्गदर्शक तत्त्वाला विरोध करणाऱ्या मुस्लिम लीगच्या नेत्याप्रमाणेच आहे. देशहिताच्या महत्त्वाच्या विषयावर मुस्लिम लीगची भाषा बोलणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आता तरी आपण हिंदुत्व सोडले नाही असे सांगू नये, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी सोमवारी (दि. १९) मुंबईत पत्रकारांशी बोलताना केले.

विश्वास पाठक म्हणाले की, शिल्लक सेनेच्या शिबिरात भाषण करताना उद्धव ठाकरे यांनी समान नागरी कायद्यामुळे हिंदूंना किती त्रास होणार आहे ते सांगा, असे आवाहन केले. सरकारने समान नागरी कायदा करावा असे मार्गदर्शक तत्त्व देशाच्या संविधानात समाविष्ट केले गेले. त्यावेळी घटना समितीच्या बैठकीत अनेक मुस्लिम सदस्यांनी त्याला जोरदार विरोध केला होता. त्यापैकी एकजण असलेले मुस्लिम लीगचे मद्रासचे सदस्य बी. पोकर यांनी या तरतुदीला विरोध करताना हिंदू धर्मियांचा मुद्दा मांडला होता.

समान नागरी कायद्यामुळे होणारा हस्तक्षेप जुलमी आहे अशी हिंदूंची निवेदने आपल्याकडे आली तसेच हिंदू समाजातील अनेक घटक याच्या विरोधात बंड करीत आहेत, असे त्या मुस्लिम सदस्याने सांगितले होते. उद्धव ठाकरे यांनीही समान नागरी कायद्यामुळे हिंदूंना त्रास होईल हा लावलेला शोध मुस्लिम लीगच्या भूमिकेसारखाच आहे.

ते म्हणाले की, मुंबई महापालिका निवडणुकीत २० टक्के मतांच्या गठ्ठ्यासाठी समान नागरी कायद्याबद्दल अपप्रचार करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी थेट मुस्लिम लीगच्या पावलावर पाऊल ठेवले आहे. त्यामुळे आता तरी आपण हिंदुत्व सोडले नाही असे सांगणे त्यांनी बंद केले पाहिजे.

# धनगर समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागोठणे : प्रतिनिधी**

रायगड धनगर समाज कल्याणकारी संस्था (मुंबई) यांच्या वतीने इ. दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व समाजातील गरिब गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्यावाटपाचा कार्यक्रम रविवारी (दि. १८) मुंबई येथे झाला.

या वेळी रायगड धनगर समाज कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष जनार्दन ढेबे, उपाध्यक्ष महेश लांबोर, सचिव प्रकाश वरक, गणेश गोरे, खजिनदार नामदेव झोरे, हरिचंद्र लांबोरे व कार्याध्यक्ष अनंता गोरे, सल्लागार वसंत शिंगाडे यांच्या हस्ते इ. दहावीमध्ये प्रथम प्रवीण प्रकाश ढेबे, द्वितीय परेश वसंत शिंगाडे, तृतीय क्रमांक समीरा गणेश हिरवे आणि चतुर्थ क्रमांक रिया राया ढेबे, तर बारावी परीक्षेत प्रथम पंकज तुकाराम शिंगाडे, हर्षदा हरिश्चंद्र अवकिरे या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

# कविसंमेलनातून निसर्ग संवर्धनाचा संदेश

**उरण : बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद उरण व मधुबन कट्टा यांच्यातर्फे शनिवारी (दि. १७) सायंकाळी विमला तलाव उरण येथे ९२वे कविसंमेलन आणि जीवनगौरव सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी लोकशाहीर दत्ताराम म्हात्रे यांच्या गीतगायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

या कार्यक्रमाला उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, आदर्श शिक्षिका शारदा खारपाटील, पत्रकार विठ्ठल ममताबादे, अजय शिवकर मधुबन कट्ट्याचे सूर्यकांत दांडेकर यांच्यासह जेष्ठ नागरिक आदी  उपस्थित होते. या कविसंमेलनात आदर्श शिक्षक संजय होळकर, प्रा. एल. बी. पाटील, सेवानिवृत्त शिक्षक भ. पो. म्हात्रे, निमंत्रित कवी केशव म्हात्रे, स्वागताध्यक्ष भरत पाटील, रमण पंडीत, राम म्हात्रे, भालचंद्र म्हात्रे, अनुज शिवकर आदींनी कविता सादर केल्या. या कविसंमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत मुकादम यांना देण्यात आले होते.

या कविसंमेलनात ४७ कवी उपस्थित होते. यावेळच्या कवितेचा विषय होता आगमन पावसाचे–रक्षण पर्यावरणाचे. त्यामुळे सर्व कवींनी आपल्या गितातून, कवितेतून पर्यावरण



संरक्षणाचा, संवर्धनाचा संदेश दिला. सजीव सृष्टी, निसर्ग वाचविण्याचे सर्वांना आवाहन केले.

कार्यक्रमात महामुंबई चॅनेलचे संपादक मिलिंद खारपाटील, सिता पाटील यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रा. राजेंद्र मढवी यांचे वाढदिवसानिमित्ताने अभिष्टचिंतन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या मनोगतात कविसंमेलनाची वाहवा केली आणि शुभेच्छाही दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार म. का. म्हात्रे गुरुजी यांनी केले. प्रत्येक महिन्यात १७ तारखेला उरणमधील विमला तलाव येथे कवी संमेलन भरत असते. या कवी संमेलनाला दिवसेंदिवस ज्येष्ठ नागरिकांसह युवकांचाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

# बेकायदेशीर फेरफार; पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

बनावट फेरफार सादर करून मूळ फेरफार बनावट असल्याचा दावा महाड उपविभागीय कार्यालयात करीत मूळ जमीन मालकाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी रमेश सजनराव मोरे (रा. पोलादपूर) यांनी पाच जणांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. रमेश मोरे यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, राजेश चंद्रकांत संसारे (रा.महाड), शुभांगी अरुण प्रधान (रा. मुंबई), वैभव अरुण प्रधान, वैशाली सुधीर कुलकर्णी, प्रीती मिलिंद साटम यांनी मूळ फेरफार क्र.१४२७च्या विरोधात महाड उपविभागीय कार्यालयात दावा दाखल केला होता. त्यांच्या तक्रारीनुसार फेरफार क्र. १४७२ हाच मूळ फेरफार असल्याचे दाखवून आरटीएस. अपील क्रमांक ८२/ २०१९ ई.क्यू.जी. डी. नंबर १०९/२०१९ अन्वये दावा दाखल केला होता. मूळ मालकाची जमीन फसवणूक करण्याच्या उद्देशाने हा दावा दाखल केला असल्याचे फिर्यादी रमेश मोरे यांनी नमूद करून दावा दाखल करणाऱ्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. महाड शहर पोलिसांनी त्यानुसार भादंवि. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# कोपरखैरणेत पालिकेची एक दिवसाआड शाळा

## शिक्षक नसल्याने ओढवली नामुष्की

**नवी मुंबई : बातमीदार**

गेल्या वर्षभरापासून शिक्षकांचा तुटवडा जाणवणाऱ्या कोपरखैरणे येथील पालिकेच्या सीबीएसई शाळेत आवश्यक शिक्षक संख्येअभावी सोमवारपासून शाळा एक दिवसाआड चालवण्याची नामुष्की ओढवली आहे. पालिका मुख्यालयातच शाळा भरविण्याचा इशारा पालकांनी दिला आहे.

मागील वर्षभरापासून अपुऱ्या शिक्षक संख्येअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाले तरी फक्त आश्वासनच दिले जात असून कोपरखैरणे सीबीएसई शाळेतील १३७५ विद्यार्थ्यांना फक्त पाच शिक्षक आहेत. त्यामुळे कशीबशी शाळा चालवण्यासाठी पहिली दुसरीचे वर्ग सोमवार, बुधवार, शुक्रवार या दिवशी तर तिसरी ते पाचवीचे वर्ग मंगळवार, गुरुवार, शनिवारी भरवण्यात येत आहेत.

सहावीचा वर्ग मात्र दररोज शाळेत बोलवण्यात येणार आहे. सीवूड्स व कोपरखैरणे येथे पालिकेच्या दोन सीबीएसई शाळा पालिकेने सुरु केल्या, पण अपुऱ्या शिक्षकांअभावी पालिका चालवत असलेल्या कोपरखैरणेतील सीबीएसई शाळेतील शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे, तर दुसरीकडे पुण्यातील आकांक्षा संस्थेद्वारे चालवण्यात येणारी सीवूडस येथील शाळा मात्र अत्यंत व्यवस्थितपणे सुरू आहे. १५ जूनपासून राज्यभरातील शाळा सुरू झाल्या आहेत, परंतु नव्याने सुरू झालेल्या शैक्षणिक वर्षातही पुरेसे शिक्षक नसल्याने कोपरखैरणे येथील सीबीएसई शाळा सोमवारपासून एक दिवसाआड भरण्याची नामुष्की ओढवली आहे. सीवूड्स येथील आकांक्षा संस्था चालवत असलेल्या शाळेत सुमारे १,१५० विद्यार्थ्यांना ५२ शिक्षक व सात मदतनीस तर कोपरखैरणेत १,३७५ विद्यार्थ्यांना फक्त पाच शिक्षक आहेत.

कोपरखैरणेतील सीबीएसई शाळेत इयत्ता चौथीचे १३० विद्यार्थी इ. पाचवीचे १४० विद्यार्थ्यांना एक शिक्षक याप्रमाणे हॉलमध्ये शिक्षण घेण्याची वेळ महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे ओढवली आहे.

> **कोपरखैरणेतील सीबीएसई शाळेत शिक्षक भरती तातडीने करण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे.**
> **–दत्तात्रय घनवट, उपायुक्त, शिक्षण विभाग, नवी मुंबई पालिका**

# वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी प्रशासनाचा पुढाकार

## ■ वारी मार्गावरील खासगी दवाखाने सुरू ठेवावे
## ■ आरोग्यमंत्री डॉ. प्रा. तानाजी सावंत यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

पंढरपूर वारी सोहळ्यातील कोणीही वारकरी आरोग्य सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग सर्वार्थाने सज्ज असून, या वर्षी शासनाच्या आरोग्य यंत्रणेबरोबर, खासगी वैद्यकीय व्यावसायिकांना वारी दरम्यान आपले दवाखानेही सुरू ठेवावे, असे आवाहन आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी आढावा बैठकीत केले.

वारीच्या कालावधीत पंढरपूर परिसरातील व वारी मार्गावरील काही खासगी वैद्यकीय व्यावसायिक आपले दवाखाने बंद ठेवत असल्याचे आढळून आले आहे. शासकीय यंत्रणा सज्ज असली तरी वारीदरम्यान साथीची परिस्थिती निर्माण झाल्यास उपलब्ध शासकीय यंत्रणेवर ताण पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्री डॉ. सावंत यांनी आषाढीवारी मार्ग, पंढरपूर शहर व परिसरातील खासगी दवाखाने व रुग्णालये सुरु ठेवण्याबाबत सूचना केल्या आहेत.

वैद्यकीय व्यावसायिकांसमवेत बैठक आयोजित करून रुग्णालये व दवाखाने सुरू ठेवण्याच्या सूचना देण्याबाबत त्यांनी जिल्हास्तरीय यंत्रणांना सूचित केले, तसेच याबाबतची जनजागृती करणे, खासगी रुग्णालये व दवाखाने कार्यरत असल्याची खात्री करण्यासाठी धडक पथके पाठवणे याबाबत सोलापूरचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हा शल्यचिकित्सकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. ठोस कारणाशिवाय दवाखाना व रुग्णालये बंद ठेवल्यास कारवाई करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी वारकऱ्यांच्या सोयीसाठी दवाखाने सुरु ठेवण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी वारकरी पायी चालत पंढरपूरला येतात. त्यामुळे वारकऱ्यांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्यास त्यांना तत्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने आरोग्यमंत्री प्रा. डॉ. सावंत यांचे संकल्पनेतून आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

### फिरत्या वैद्यकीय पथकाची सोय


या उपक्रमांतर्गत पालखी मार्गावर आरोग्य विभागाने आवश्यक त्या सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध केलेल्या असून, वारी मार्गावर फिरत्या वैद्यकीय पथकाची सोयही केलेली आहे. २७ ते २९ जून या कालावधीत पंढरपूर शहरात भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन केलेले आहे.

# उरणमधील दाम्पत्याची पाण्याखाली योगा प्रात्यक्षिके

**उरण : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून उरणमधील माजी मरीन कमांडो रवी कुलकर्णी आणि त्यांची पत्नी योगप्रशिक्षिका विदुला यांनी तेरा फूट पाण्याखाली २२ मिनिटे योगासनाची प्रात्यक्षिके सादर केली. पाण्याखालील अशा प्रकारची प्रात्यक्षिके हा देशातील बहुतेक पहिलाच विक्रम असावा, असे रवी कुलकर्णी यांनी प्रात्यक्षिके यशस्वी केल्यानंतर सांगितले. येथील श्री बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलातील स्विमिंग पुलमध्येही प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

पाणबुड्यासाठी लागणाऱ्या डायव्हिंग साहित्याचा अचूक वापर करून या दांपत्याने पाण्याखाली योग प्रात्यक्षिके केली. ओंकार, प्रार्थना आणि सूर्यनमस्कारांनी प्रारंभ करून कुलकर्णी दांपत्याने या प्रात्यक्षिकांना सुरुवात केली.



प्रत्यक्षात, ड्रायव्हिंग इक्विपमेंट मुळे पाण्याखाली स्थिर राहणे बऱ्यापैकी अवघड जात होते. पण, या कुलकर्णी दांपत्याने गेले काही दिवस निष्ठेने आणि चिकाटीने सराव केल्यामुळे त्यांनी पाण्याखाली स्थिर राहून आपले लक्ष्य साध्य केले.

त्यांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांमध्ये पर्वतासन, त्रिकोणासन, वीरभद्रासन, वृक्षासन, नटराजासन, देवीची पोझ या उभ्याने करण्याच्या आसनांचा समावेश होता. त्याचप्रमाणे बसून किंवा विशिष्ट पोझ मध्ये करण्याच्या पर्वतासन, सिंहासन, भुजंगासन, शलभासान, पद्मासन या आसनांचीदेखील त्यांनी प्रात्यक्षिके दाखवली. त्यानंतर पाण्याखाली मेडिटेशन करून तसेच ओंकार आणि श्लोक म्हणून त्यांनी प्रात्यक्षिकांची यशस्वी सांगता केली.

१३ फूट पाण्याखाली तब्बल २२ ते २५ मिनिटे योगाची ही प्रात्यक्षिके झाली. त्यानंतर त्यांनी वर येऊन अभिवादन केले. योगदिनाचे औचित्य साधून ही अनोखी प्रात्यक्षिके सादर केल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे भरभरून कौतुक केले.

या प्रात्यक्षिकांदरम्यान त्यांना माजी मरीन कमांडो विनोद कुमार, आणि राम सवार पाल यांचे सहकार्य मिळाले. प्रीतम पाटील यांनीही सहाय्य केले.


महावितरण

**ई-निविदा सुचना**

निम्नस्वाक्षरीकांराकडून उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिनीच्या प्रतिबंधात्मक देखभालीच्या कामासाठी उपविभाग निहाय्य व रोहीत्रांच्या प्रतिबंधात्मक देखभालीच्या कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदाराकडून  ई- निविदा मागवण्यात येत आहेत. सदरचे निविदा क्रमांक आर्थिक वर्षे २०२३-२४ चे T-०२, T-०३, T-०४, T-०५, T-०६, T-०७, T-०८, T-०९, T-१० असे आहेत. निविदा  विक्री कालावधी दि. २०.०६.२०२३ ते २९.०६.२०२३.(संध्याकाळी ६ वाजेपर्यंत) निविदा भरण्याची शेवटची तारीख दि. ३०.०६.२०२३ रोजी १२.०० वाजेपर्यंत. वरील निविदा भरण्याकरीता कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर भेट द्यावी.

कार्यकारी अभियंता
पनवेल ग्रा.विभाग

# भाजपतर्फे उरण फाटा येथे निवारा शेड

## ज्येष्ठ नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर १९ए, उरण फाटा येथे ज्येष्ठ नागरिकांच्या मागणीनुसार भाजपचे स्थानिक माजी नगरसेवक तथा सभागृह नेते रवींद्र इथापे यांच्या प्रयत्नातून भव्य निवारा शेड बांधण्यात आले असुन त्याचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी रवींद्र इथापे यांनी सांगितले की, गेले वर्षभरापासून या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक या निवारा शेडची मागणी करीत होते. उन, वारा, पाऊस या पासून संरक्षण व्हावे तसेच लहान मुले, महिला व पुरूष यांनादेखील या शेडचा आश्रय घेता यावा यासाठी या निवारा शेडची उभारणी करण्यात आली आहे.




उरण फाटा हे नेरूळचे मुख्य प्रवेशद्वार तसेच एअरपोर्ट, जेएनपीटी, उरण, पुणे व मुंबई ला जोडणारा महत्त्वाचा भाग असल्याने या ठिकाणी उद्यान, आकर्षक फाऊंटन, हाय टेन्शनखाली सुशोभीकरण, उरणफाटा ते एल.पी.जंक्शनपर्यंत लॉन, त्यास संरक्षित कुंपन, हायवेच्या ब्रिजला आकर्षक रंगरंगोटी, हायमास्ट ही कामे प्रामुख्याने याठिकाणी घेण्यात आली आहेत, असेही इथापे यांनी सांगितले.

या वेळी माजी नगरसेविका सुरेखा इथापे, उद्योजक दिनेश पासोरिया, भाजप तालुका उपाध्यक्ष रवींद्र हांडे, वॉर्ड अध्यक्ष रवींद्र डेरे, महिला वॉर्ड अध्यक्षा योजना नलावडे, उपाध्यक्षा संगिता काळे, भिमाशंकरचे चेअरमन रमेश पवार, सेक्रेटरी संजय चव्हाण, खजिनदार आशुतोष हांडे, भिमाशंकर सामाजिक संस्थेचे अशोक हिंगे, दत्ता नलावडे, अलकनंदाचे सेक्रेटरी प्रवीण बारवे, नवदुर्गाचे चेअरमन टी. ए. कोळेकर, साईस्पर्शचे चेअरमन प्रकाश मोरे, अंकुश हाडवळे, विसावाचे राजाराम माने, लेण्याद्रीचे रमेश आहुजा, चंदु नायर, सुदाम औटी, दिलीपकुमार आहुजा, अतुल पांडे, उमेश पांडे, अमरिक सिंग भिमाशंकरचे संचालक डी. जी. पाटील, भिमराव सुर्यवंशी, राजेंद्र खिलारी, संतोष चासकर, रवि पुजारी, संतोष फापाळे, अविनाश चासकर, विजय साधवाणी, मधुकर गुर्जर, अनिल हांडे, मधुकर गावडे, गणेश मोरे आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्यवसाय नीती व शिष्टाचारावर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि. १९) सकाळी ११.३० वाजता कौशल्य विकास कक्षाच्या मार्फत व्यवसाय नीती व शिष्टाचार या विषयावरती द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. डॉ. सूर्यकांत परकाळे उपस्थित होते. या सत्रामध्ये प्रमुख वक्त्यांनी व्यवसाय नीती व शिष्टाचार यांना व्यावसायिक जीवनामध्ये किती



महत्त्व आहे, तसेच तरुण म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून राष्ट्रीय विकासासाठी हातभार लावणे व उत्कृष्टतेचा शोध घेणे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले सत्राच्या शेवटी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संस्थेच्या शैक्षणिक सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करून संस्थेच्या वेळोवेळी मिळणाऱ्या सहकार्य व पाठबळाबद्दल कृतघ्नता व्यक्त केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या सत्रासाठी उपस्थित राहून प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला व शुभेच्छा दिल्या. या सत्राचे आयोजन कौशल्य विकास समितीच्या समन्वयक प्रा. रूपाली नागरेकर यांनी केले. या सत्रासाठी अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष प्रा. महेश्वरी झिरपे तसेच महाविद्यालयातील सर्व विभागातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी तसेच द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी व विद्यार्थिनी या सत्राचा लाभ घेतला तसेच प्रा. सफीना मुकादम, प्रा. डॉ. धनवी आवटे, प्रा. तनुजा सुमन यांनी सहकार्य केले.

# घोटगावात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## नेत्र तपासणीचाही उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसी मधील नामांकित कंपनी ओमया इंडिया प्रा. लि-सीएसआर इनिशिएटीव्ह २२-२३ अंतर्गत घोट येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि डॉक्टरांचा सल्ला तसेच मोफत नेत्र तपासणीसह चष्मा वितरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी गावातील नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेण्यासाठी गर्दी केली होती. जवळपास २००हुन अधिक नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

ओमया कंपनीच्या माध्यमातून हा उपक्रम १७ व १८ जुन हे दोन दिवस घोटगावातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन घोट



गावातील युवा उद्योजक विनोद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ओमया कंपनीचे अधिकारी धनाजी पिंगळे यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैभव भोईर व शाळेचे मुख्याध्यापक संजय पाटील यांच्या माध्यमातून शाळा उपलब्ध करून देण्यात आली.

या वेळी घोट गावातील युवक हनुमान निघुकर, एकनाथ कोळी, गिरीश पाटील व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये गाडीत मृतदेह आढळल्याने खळबळ

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर १७मध्ये उभ्या चारचाकी गाडीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह सोमवारी (दि. १९) आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.



नवीन पनवेल सेक्टर १७ या ठिकाणी असलेल्या उत्सव बार समोरील रस्त्यावर सिल्वर रंगाच्या मारुती स्विफ्ट गाडी (एमएच ०१ एई ७४९२) मध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. प्रशांत खुशलचंद शर्मा असे या मयत व्यक्तीचे नाव असून अधिक चौकशीमध्ये गेल्या तीन दिवसापासून प्रशांत शर्मा हे आपल्या राहत्या घरी गेले नव्हते. त्यामुळे त्यांची पत्नी त्यांचा शोध घेत होती. सोमवारी सकाळी सेक्टर १६ येथून आपल्या दुचाकीवरून सेक्टर १७ येथे जात असताना तिला आपली गाडी उत्सव बार समोर उभी असलेली आढळली. त्यामुळे तिने आत डोकावले असता प्रशांत हा ड्रायविंग सीटवर आडवा झालेला आढळला.

मोठ्या प्रयत्नाने गाडीचा दरवाजा उघडल्यानंतर प्राथमिक तपासणीत तो मृत अवस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच खान्देश्वर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत घटनेची प्राथमिक चौकशी करून त्याचा मृत्यू का व कशामुळे झाला याचा शोध सुरू केला आहे.





**पनवेल : भाजपचे रायगड जिल्हा विस्तारक अविनाश कोळी यांना वाढदिवसानिमित्त पक्षाचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष राजेश मपारा, सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, संयोजक झोपडपट्टी सेलचे शहर अध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, महेश पाटील, अशोक साळुंखे आदी उपस्थित होते.**

# रांजणपाडा शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन शैक्षणिक वर्ष २०२३-२४च्या शाळेच्या पहिल्याच दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-रांजणपाडा शाळेतील मुलांना दप्तर तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप रांजणपाडा गाव भाजप अध्यक्ष दयानंद मोकल यांच्या हस्ते करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य वाटपच्या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य तेजस पाटील, एकनाथ घरत, संदेश घरत तसेच गाव अध्यक्ष दयानंद मोकल उपस्थित होते. कार्यक्रमाला एसएमसीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पालक वर्ग, ग्रामस्थ, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच विद्यार्थी यांचे मोलाचे सहभाग होते.



या कार्यक्रमाला मुख्याध्यापक आणि ग्रामस्थांच्या विनंतीला मान देऊन दयानंद मोकळ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारले. विद्यार्थांसाठी असेच काही तरी नवीन उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामात आर्थिक हातभार लावू, असे आपल्या मनोगतामध्ये त्यांनी आवर्जून उल्लेख केला. उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लायन्स क्लब सरगमतर्फे योग दिनानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब पनवेल सरगमतर्फे बुधवारी (दि. २१) योग दिन साजरा करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम बुधवारी सकाळी ९ वाजता गोखले सभागृह येथे होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील उपस्थित राहणार असून योग गुरू सत्यपाल चुघ हे सर्वांना मार्गदर्शन करणार आहेत. सर्व योग प्रेमींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल सरगम क्लबच्या अध्यक्ष स्वाती गोडसे यांनी केले आहे.

# नवीन पनवेल येथील विद्यार्थी वाहकांना छत्रीचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्यात विद्यार्थी वाहक यांची अडचण लक्षात घेऊन नवीन पनवेल येथील प्रगती कॉम्प्युटरच्या वतीने पनवेल, नवीन पनवेल विभागातील शेकडो विद्यार्थी वाहकांना छत्रीचे वाटप करण्यात आले.

या वेळी प्रगती कॉम्प्युटरचे मालक विजय चव्हाण यांनी कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना आपण वेळेवर पोहचवता त्यांना शाळेत वेळेवर पोहचण्यासाठी पालकापेक्षा जास्त जबाबदारी आपण उचलता ही कौतुक करण्यासारखी बाब असल्याचे मत व्यक्त केले.




नवीन पनवेल विभागामध्ये शेकडो (ओमनी, इको) स्कूल व्हॅन नविन पनवेल व पनवेल परिसरातून विद्यार्थ्यांना ने-आण करतात. ज्या ठिकाणी मोठ्या बस जात नाही त्या ठिकाणावर स्कुल व्हॅन जाऊन विद्यार्थ्यांना सेवा देतात. पावसाळ्यात विद्यार्थ्यांची होणारी अडचण लक्षात घेऊन नवीन पनवेल येथील प्रगती कॉम्प्युटरच्या वतीने पनवेल, नवीन पनवेल विभागातील शेकडो विद्यार्थी वाहकांना छत्रीचे वाटप करण्यात आले.

छत्री वाटप कार्यक्रमावेळी बी. एल. पाटील, पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रशांत माने, पत्रकार सुरेश भोईर, नवीन पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचे कार्याध्यक्ष बाळासाहेब जगताप, उपाध्यक्ष चंद्रकांत शिंदे, खजिनदार शहाजी बोकडे, सचिव हनुमान कोळी, सभासद व इतर मान्यवर उपस्थित होते.



## श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर

वर्ष २० वे | || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || | स्थापना २००३



श्री समर्थ सद्गुरु बाळ-कृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

# पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मती आषाढ शु. ०३, शके १९४५, बुधवार दिनांक २१/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०४, शके १९४५, गुरुवार दिनांक २२/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## ✻ कार्यक्रम ✻

| बुधवार, दिनांक २१/०६/२०२३ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब, पुणे,<br>ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण), ह. भ. प. रामनाथ महाराज (वहाळ),<br>श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्‍वंभर भजन मंडळ, गव्हाण गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर गायीका : श्रीमती. हिराबाई घरत,<br>सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत,<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर गायीका : सौ. सुप्रिया घरत<br>वादक : तुषार घरत |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके (विहीघर) पखवाज : श्री. मधुकर डोंगरे |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | ध्यान आणि पारायण वाचन |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, कोपर बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर)<br>पखवाज : गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| सायं. ०९.०० ते ११.०० किर्तन | ह. भ. प. पुरुपोत्तम महाराज घाटाव आणि मंडळी |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

| गुरुवार, दिनांक २२/०६/२०२३ | |
|---|---|
| सकाळी ०८.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर - रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर (शि. नगर), नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा),<br>पखवाज : गौरव म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

### ✻ कार्यक्रमाचे ठिकाण ✻

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

### ✻ व्यवस्थापक ✻

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) शिवाजीनगर- गव्हाण- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

### ✻ संयोजक ✻

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

संपादकीय

## मणिपुरचे दुखणे

सध्या मणिपूर हे राज्य हिंसाचाराने होरपळले आहे. तिथली अशांतता अस्वस्थ करणारी आहेच. सध्या तेथे भाजपचेच सरकार अस्तित्वात आहे आणि केंद्र सरकारच्या पाठबळावरच ते विकासाचे काम करत आहे. तरीही गेल्या महिन्यापासून तेथे पुन्हा हिंसाचार उफाळला आहे. मणिपूरमधील दोन जमातींमधील परस्परांविषयीचा अविश्वास विकोपाला गेल्याने त्याची परिणती हिंसाचारात झाली आहे.

**सात बहिणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईशान्येकडील राज्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात खऱ्या अर्थाने आणून ठेवले ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अथक प्रयत्नांनीच. ही बाब तर आता सर्वश्रुतच आहे. काँग्रेस राजवटीत मणिपूरसह ईशान्येतील राज्यांना जो दुजाभाव वाट्याला आला, तो कुठल्याही राज्याच्या नशिबी येऊ नये. या दुर्गम परिसरातील नागरिकांना त्या काळातील सत्ताधाऱ्यांनी जणु वाऱ्यावर सोडले होते. निवडणुकांपूर्वी काही काळ विकासाच्या गप्पा मारायच्या, सर्वधर्मसमभावाची उजळणी करायची, भाईचाऱ्याच्या बाता करून अनेक खोटीनाटी आश्वासने द्यायची हा खेळ काँग्रेसच्या अंगाशी येणार होताच. भारतीय जनता पक्षाने आपली पाळेमुळे तेथे घट्ट रोवल्यानंतर काँग्रेसचे उच्चाटन शक्य झाले. मणिपूरच्या एकूण लोकसंख्येत तेथील मैतेई समाजाचे प्रमाण ५३ टक्के आहे. राज्यातील विशेषत: मैदानी भागात मैतेई समाजाचे प्राबल्य आहे. या समाजाला अनुसूचित जमातीतून आरक्षण देण्याच्या हालचाली सुरू झाल्याच्या मुद्यावरून राज्यात संघर्षाला सुरूवात झाली. राज्याच्या डोंगराळ भागात राहणाऱ्या कुकी आणि नागा या समाजांमध्ये मैतेईंविषयी अविश्वासाची प्रचंड भावना निर्माण झाली आहे. मैतेई आणि कुकी या दोन समाजांमध्ये सध्या संघर्ष पेटला असून पोलीस प्रशिक्षण केंद्रे तसेच निमलष्करी दलांच्या केंद्रांवर हल्ले करून जमावाने शस्त्रे लुटून नेली असून ताज्या हिंसाचारात त्याचा वापर होत असावा अशी भीती आहे. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी मोदी सरकारने सर्व प्रयत्न केले व अजुनही ते सुरूच आहेत. पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मणिपूरमधील परिस्थिती पूर्ववत व्हावी यासाठी कोणतीही कसर बाकी ठेवलेली नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते दत्तात्रेय होसबळे यांनी मणिपूरमध्ये तातडीने शांतता प्रस्थापित करावी, अशा आशयाचे ट्वीट केले आहे. त्यावरून संघाच्या प्रमुखांनी मोदी आणि शहा यांचे कान टोचल्याची टीका विरोधक करत आहेत. वास्तविक याला संघाकडून टीकाही म्हणता येणार नाही. भाजप सरकारला संघाकडून वेळोवेळी मार्गदर्शन होत असते. त्यात वावगे काहीही नाही. उलटपक्षी मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याची क्षमता मोदी किंवा शहा यांच्यामध्येच आहे, असा विश्वास संघ नेत्यांच्या मार्गदर्शनातून व्यक्त होतो. गृहमंत्री शहा यांनी वारंवार मणिपूरला भेटी देऊन परिस्थिती आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. कर्नाटकमध्ये निवडणुकांचा धडाका सुरू होता, त्याकाळातही शहा यांनी मणिपूरवर लक्ष ठेवले. केंद्र सरकारचे दुर्लक्ष झाले असते तर मणिपूर आज पेटताना दिसले असते. हिंसाचाराचे प्रकार तेथे घडत आहेत हे काही चांगले लक्षण नाही याची जाणीव सर्वांनाच आहे. मणिपूरमध्ये पुन्हा शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी सर्वांनीच मोदी-शहा यांच्या पाठिशी उभे राहायला हवे, परंतु तसे करण्याऐवजी विरोधीपक्ष मणिपूरच्या दुखण्याचे राजकारण करण्यात मश्गुल आहेत. स्थानिक समाजांमधील तेढीचा गैरफायदा मणिपूरमधील फुटीरतावाद्यांनी उचलू नये किंवा परकीय शक्तींनी नेमक्या याच काळात काही डाव साधू नये याचे तरी भान विरोधकांनी ठेवायला हवे आहे.**

# दरड कोसळल्याने रायगडाचे दरवाजे पुन्हा बंद






खबरबात
महेश शिंदे

किल्ले रायगड दरड, ही धोक्याची घंटा तर नाही ना? संपूर्ण महाराष्ट्राच स्फुर्तीस्थान असलेल्या किल्ले रायगडावर दरड कोसळण्याच्या घटनांमुळे रायगडाचे दरवाजे पुन्हा एकदा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आले आहेत.

आज किल्ले रायगडावर कोट्यवधी रुपयांची विकास कामे होत आहेत. लाईट व्यवस्था, पथ दिवे, पाण्याची सुविधा, परसबंद पाई मार्ग ही सर्व कामे जरी होत असली तरी किल्ले रायगड हा काही सपाटी प्रदेश नाही. एका उंच डोंगरावर जो की सह्याद्रीच्या रागांपासुन अलग झाला आहे अशा डोंगर माथ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी राजधानी स्थापन केली. मुळात राज्य कारभार आणि प्रदेशावर अमल ठेवण्यासाठी राजधानीचे ठिकाण हे सपाटी प्रदेश आणि नैसर्गिक साधन संपत्तीने युक्त अशा ठिकाणी केली जाते. मात्र दिल्लीची मुघलशाही, विजापूरची आदिलशाही, हैदराबादची निजामशाही आणि पोर्तुगीज यांच्यापासून असलेला धोका लक्षात घेऊन तसे सैन्य सामर्थ्य कमी असल्याने महारांना राजधानीसाठी हा रायगड पर्याय निवडावा लागला होता.

राजधानी असली तरी किल्ले रायगडावर त्या काळात केवळ पाचहजारांची शिवबंदी असायची. या उपर अधिक लोकांना रायगडावर येण्यास आणि राहण्यास बंदी होती. गडावरी प्रतिकुल वातवरण पाहता जिजाऊ मासाहेबांनादेखील गडाच्या पायथ्याला पाचाडला रहावे लागले होते. जर जिजाऊ ना हा नियम पाळावा लागला होता तर आज शिवभक्तांनीदेखील याचा विचार करायची वेळ आली आहे. अमरनाथ, चारधाम, पंढरपूर वारी प्रमाणे आता रायगडावर शिवभक्ताच्या वाऱ्या येऊ लागल्या आहेत. काही हजार पर्यटक समजून शकतो, मात्र लाखांच्या संख्येने जर शिवभक्त आणि पर्यटक रायगडावर येणार असतील तर रायगडावरील वातावरण बिघडू शकते. शिवभक्ताच्या अतिउत्साही पणामुळे रायगडावरील पुरातन वास्तुदेखील ढासळू लागल्या आहेत, मात्र सर्वांत धोका कोसळणाऱ्या दरडींमुळे निर्माण झाला आहे. लाखो लोकांच्या पावलांमुळे किल्ले रायडावरील मातीची मोठ्या प्रमाणात धुप होऊ लागली आहे. या मुळेच दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. शिवभक्तांच्या या भक्ती चाच अतिरेक झाला म्हणून की काय रायगड अनिश्चित काळासाठी बंद करावा लागला आहे, मात्र या निर्ययामुळे सामान्य पर्यटकांचे हाल झाले आहेत तर स्थानिक व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. आता प्रशासन



आणि शिवभक्तांचे कैवारी असणाऱ्यांनी याची दखल घेऊन आवर घातली पाहिजे. नाहीतर जस दीडशे वर्षांपूर्वी ब्रिटीशांनी रायगडावर मज्ञाव केला होता तसा मज्ञाव निसर्गाला करावा लागेल. या साठी किल्ले रायगडसाठी एक आचारसंहिता व्हायला हवी, जेणेकरून स्वराज्याची राजधानी पुढील हजारो वर्षे छत्रपती शिवरायांचा इतिहास जागृत ठेवू शकेल.

## वारीचा अगाध महिमा...!



वारी म्हणजे वारकऱ्यांची जीवनवाहिनी. वारीला गेल्यावर मनाला आध्यात्मिक शांती आणि समाधान मिळते. जो विठ्ठल दर्शनासाठी नियमित वारी करतो तो वारकरी. जगाला मोहून टाकणाऱ्या या वारीचा प्रत्येक दिवस हा शिस्तीचा आणि नियमाने चालणाऱ्या भक्तांचा सोहळा असतो.

वारी म्हणजे पंढरपूरच्या विठोबाच्या दिशेने निघालेला भक्तीचा प्रवाह, मराठी संस्कृतीचे वैभव. वारीमध्ये चालत असताना एकमेकांविषयी आदरभाव, सात्विक विचार आणि भक्तीच्या रंगात रंगून इतरांनाही त्या रंगात रंगून घेणे ही वारकर्यांची अंतर्मनाची भावना असते. विठूरायाला भेटण्याची अपार ओढ वारकऱ्यांना वारीत चालण्याची ऊर्जा देत असते. वारकरी हा पालखी मार्गात भजन, कीर्तन आणि विठूरायाचा गजर करतो. भक्तीत दंग होऊन वारकरी कधी वारीसह पंढरपुरात पोहचतो हे त्याचे त्याला कळत नाही. विठोबाच्या दर्शन घेतल्यावर लक्ष लक्ष डोळ्यांचे पारणे फिटते व वारकरी विठोबाला डोळ्यावाटे मनात घट्ट भरून ठेवतो.

आषाढी वारी (पंढरपूर) म्हणजे वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरपर्यंत केलेली पदयात्रा. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय. या संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारी. या वारीमध्ये अनेक जाति-धर्माचे लोक, भाविक, भक्तसुद्धा मोठ्या संख्येने सहभागी होतात. वारी हा एक आनंद सोहळा असतो. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. देहू व आळंदीहून दरवर्षी लाखो वारकरी पायी वारीने पंढरपूरला जातात. ही परंपरा शेकडो वर्षांपासून आजपर्यंत चालत आली आहे.

वारीत कोणी लहान-मोठा नाही वा गरीब-श्रीमंत कोणी नाही. सगळे विठूरायाचे भक्त. वारी माणसा-माणसातला भेद पुसून टाकते. वारीमुळे माणसात समानता, नीतिमत्ता, नियती आणि बंधूभाव निर्माण होतो. अशा या वारीचा महिमा अगाध आहे.

**-डॉ. संतोष सुदाम जाधव, सुखम हॉस्पिटल, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

### फोनमधील स्पायवेअरसंदर्भात केंद्राने जारी केला अलर्ट

इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमने एक धोकादायक स्पायवेअर शोधून काढला आहे. तो तुमच्या फोनमधील केवळ माहितीच चोरत नाही, तर फोनच्या कॅमेराचा वापर करून गुपचूप रेकॉर्डिंगदेखील करतो. देशातील ४२ कोटी अ‍ॅण्ड्रॉइड फोनमध्ये हा स्पायवेअर शिरला आहे. 'स्पिन ओके' असे त्याचे नाव असून, प्ले स्टोरमधील १०५ प्सच्या माध्यमातून तो पसरला आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. आजकाल जवळपास प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन दिसतो. त्यात सर्वाधिक प्रमाण अ‍ॅण्ड्रॉइडवर चालणाऱ्या स्मार्टफोनचे आहे. या स्मार्टफोनमध्ये प्ले स्टोरवरून आवश्यक अ‍ॅप्स लोक गरजेनुसार डाउनलोड करतात, मात्र मागचा-पुढचा विचार न करता अनेकजण धोकादायक अ‍ॅप्स डाउनलोड करतात. हे किती धोकादायक ठरू शकते, याची सर्वसामान्य लोक कल्पनादेखील करू शकणार नाहीत. स्पिन ओके स्पायवेअर हा जावा स्क्रिट कोडच्या माध्यमातून हळूहळू क्षमता वाढवितो. अतिशय कमी कालावधीत तो मोठ्या प्रमाणात पसरला आहे.



**स्पायवेअर आहे की नाही? असे ओळखा**

तज्ज्ञांनी या स्पायवेअरपासून सुरक्षित राहण्यासाठी काही सूचना केल्या आहेत. फोनमध्ये अनेकदा जाहिराती अचानक सुरू होतात. तसे होत असल्यास हमखास स्पायवेअर तुमच्या फोनमध्ये असू शकतो. गेल्या काही महिन्यात डाउनलोड केलेले प्स अशा वेळी अनइन्स्टॉल करणे योग्य ठरेल, असे तज्ज्ञ म्हणतात.

**काय करू शकतो 'स्पिन ओके'?**

* स्पिन ओके हा तुमच्या फोनमधील कॅमेरा वापरून गुपचूप रेकॉर्डिंग करू शकतो.
* डेटा कॉपी करून अज्ञात रिमोट सर्व्हरवर पाठवतो.
* फोन कुठेही ठेवला असेल तरी आजूबाजूचे आवाज रेकॉर्ड करत राहतो.
* डिलीट केलेल्या फाइल्सदेखील तो रिकव्हर करू शकतो.

**हे अ‍ॅप्स आहेत धोकादायक**

नॉइस व्हिडीओ एडिटर, जायपा, बियूगो, एमव्ही बिट, क्रेझी ड्रॉप्स, टिक, व्ही फ्लाय, कॅश जॉइन, कॅश ईएम, फिझ्झो हे प्रमुख प्स सर्वाधिक धोकादायक आहेत. त्यापैकी जायपा आणि नॉइस व्हिडीओ एडिटरचे १० कोटी, तर बियूगो, एवव्ही बिट या अ‍ॅप्सचे पाच कोटी यूझर्स आहेत.

## पहिले मराठी उद्योजक लक्ष्मणराव किर्लोस्कर



निमित्त

लक्ष्मण काशिनाथ किर्लोस्कर हे भारतातील पहिले मराठी उद्योजक. सायकलच्या अगदी छोट्याशा दुकानापासून सुरुवात करून आपला व्यवसाय ७० हून अधिक देशांत पोहचवणारे किर्लोस्कर हे पहिले उद्योजक ठरले. किर्लोस्करांना महाराष्ट्राचे हेन्रीफोर्ड म्हणूनही गौरवण्यात आलं आहे. आज लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

लक्ष्मणराव काशिनाथ किर्लोस्कर यांचा जन्म २० जून १८६९ बेळगाव जिल्ह्यातील गुर्लहोसूर या छोट्याशा गावात झाला. लहानपणापासूनच त्यांना चित्रकला आणि यांत्रिकी वस्तूंचं प्रचंड आकर्षण होतं. चित्रकलेची आवड असणाऱ्या किर्लोस्करांनी आपल्या वडिलांच्या इच्छेविरुध्द मुंबईतील जे.जे. स्कूल ऑफ आर्टस महाविद्यालयात प्रवेश घेतला, पण काही कालावधीनंतर रंगअंधत्वाचा त्रास असल्याची बाब त्यांच्या लक्षात आली आणि त्यांना शिक्षण सोडावं लागलं. खचून न जाता त्यांनी तिथेच मेकॅनिकल ड्राफ्ट्समनच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. मुळातच यांत्रिक गोष्टींमध्ये रस असल्यानं किर्लोस्करांनी त्यात प्राविण्यही मिळवलं. मेकॅनिकल ड्रॉईंग विषयाचे शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये अल्पावधीतच प्रसिद्ध झाले. उद्योग करण्याचं स्वप्न बाळगणाऱ्या किर्लोस्करांचं नोकरीत मन रमत नव्हतं. यांत्रिकी वस्तूंची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.

मुंबई सोडून किर्लोस्कर बेळगावला आपल्या मूळ गावी परतले. आणि गावात सायकल दुरुस्तीचे दुकान थाटलं. दुकानाच्या मागील बाजूस शेड बांधून कडबा कापणीचे यंत्र बनवण्यास सुरुवात केली. लक्ष्मण किर्लोस्कर यांना शेती क्षेत्रातील सखोल ज्ञान असल्यानं शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात आल्या. खेड्यापाड्यात जाऊन किर्लोस्करांनी या यंत्राबाबत माहिती दिली. शेतकऱ्यांच्याही हे यंत्र चांगलंच पंसतील उतरलं. त्यानंतर त्यांनी सायकल दुकान ३ हजाराला विकले. आणि पूर्णपणे लक्ष कडबा यंत्र आणि लोखंडी नांगर बनवण्यावर केंद्रीत केलं. काही व्यापाऱ्यांनी नांगर खरेदी केले तर काही शेतकऱ्यांना नांगर भाड्याने वापरण्यास दिले.

दिवसेंगणित व्यवसाय वाढत असल्यानं जमिनीचा प्रश्न उद्भवत होता. दरम्यान, किर्लोस्करांच्या मित्रानं औंध येथे पडीक जमीन त्यांना वापरण्यासाठी दिली. या ओसाड जमिनीवर निवडूंग, सराटाचं साम्राज्य. अशा जमिनीवर कारखाना उभारण्यासाठी अनेक अडचणी होत्या. जिद्दी किर्लोस्करांनी कारखाना उभारण्याचं आव्हान स्विकारलं. आणि अखेर मेहनतीच्या जोरावर किर्लोस्करांनी त्या जमिनीवर उद्योगनगरी उभारली. ती उद्योगनगरी 'किर्लोस्कर वाडी' म्हणून ओळखली जाते. १९१४ साली युध्द सुरू झाल्यानं परदेशातून रंग, लोखंड मिळणं कठीण झालं. तरीही किर्लोस्कर यांनी न डगमगतान हार मानता यावरही उपाय शोधून काढलाच. कोल्हापूरमध्ये काही तोफा पडून होत्या. किर्लोस्करांनी त्या तोफा घेतल्या. तोफा वितळवून कच्चे लोखंड मिळवले आणि नांगर बनवले.

१९२० च्या सुमारास किर्लोस्करांनी ऊसाचा रस काढण्याचे मशिन आणि ड्रिलिंग मशिन याचबरोबर इतरही शेती उपयोगी साधने तयार केली. किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्कर ऑईल इंजिन, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज, किर्लोस्कर न्युमेटिक कंपनी आदी किर्लोस्कर समुहाच्या कंपन्या आहेत. शाळा, वाचनालय, क्रीडागंणे, पोस्ट ऑफिस, टुमदार घरं, उद्याने अशा विविध सोय-सुविधांनी सुसज्ञ किर्लोस्करांची किर्लोस्करवाडी हळुहळु 'आदर्श नगरी' बनली.

आयुष्यभर कठोर परिश्रम, अपयश आलं तरी खचून न जाता त्यावर मात करत किर्लोस्कर 'किर्लोस्कर ब्रदर्स कंपनी' आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यात यशस्वी झाले. किर्लोस्करांच्या सन्मानार्थ भारत सरकारनं पोस्टाचं तिकिट जाहीर केलं. आणि अखेर २६ सप्टेंबर १९५६ साली लक्ष्मणराव काशिनाथ किर्लोस्कर यांची प्राणज्योत मालवली.

**(साभार : क फॅक्टर)**

क्लिक...क्लिक...!



**सिंधुदुर्ग : पावसाळ्यात घरामध्ये पाणी गळतीचा त्रास टाळण्यासाठी ताडपत्री, प्लास्टिक पेपर दोडामार्गच्या आठवडा बाजारात मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आले होते.** (छाया : राधाकृष्ण म्हापसेकर)

## आरोग्य प्रहर

### विशेष शारीरिक समस्या असल्यास बीट सेवन टाळा



बीटरूट आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे यात शंका नाही, कारण त्यात अनेक महत्वाचे पोषक घटक आढळतात, त्याचा आपल्या शरीरावर सकारात्मक परिणाम होतो. बीटरूटमध्ये व्हिटॅमिन सी, फोलेट, प्रथिने आणि फायबर असतात, म्हणून बहुतेक आरोग्य तज्ञ ते खाण्याची शिफारस करतात. जमिनीत उगवलेले बीट खायला स्वादिष्ट आहे, त्यामुळे सर्व वयोगटातील लोकांना ते आवडते, परंतु आपण हेदेखील लक्षात ठेवले पाहिजे की बीटरूट शरीरासाठी कितीही फायदेशीर असले तरी प्रत्येकाने ते जास्त खाऊ नये, कारण यामुळे नुकसान होऊ शकते. जर तुम्हाला काही विशेष शारीरिक समस्या असेल तर बीटरूटचे सेवन टाळा.

काही लोकांच्या शरीरात लोह ओव्हरलोड खूप जास्त असतो, या वैद्यकीय स्थितीला हेमोक्रोमॅटोसिस किंवा लोह ओव्हरलोड म्हणतात. अशा लोकांनी कमीत कमी बीटरूट खावे कारण यामुळे शरीरातील लोहाचे प्रमाण आणखी वाढेल, यामुळे इतर अनेक समस्या उद्भवू शकतात.

ज्या व्यक्तीला किडनी स्टोनची समस्या असते त्याला खूप वेदना सहन कराव्या लागतात, ही समस्या दोन प्रकारची असते, पहिली कॅल्शियम बेस्ड आणि सेकंड ऑक्सलेट बेस्ड. जर एखाद्या व्यक्तीस ऑक्सलेट-आधारित किडनी स्टोनची समस्या असेल तर त्यांनी बीटरूटपासून लांब राहावे.

आपल्याला अनेकदा लक्षात आले असेल की काही लोकांना बीटरूट खाणे, किंवा त्याचा रस पिणे आवडते. परंतु जर आपण या गोष्टीचे आवश्यकतेपेक्षा जास्त सेवन केले तर आपल्या लघवीचा रंग नक्कीच बदलेल आणि तो लाल किंवा गुलाबी होईल. हे शरीरात गडबड होण्याची चिन्हे असू शकतात, म्हणून बीटरूटचे सेवन कमी करा.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

## निवडक

### आरोग्य केंद्रात पोषण आहार वाटप



**खोपोली** : प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियानांतर्गत सिप्ला कारखाना आणि हेल्प एज इंडिया फाउंडेशनच्या वतीने क्षयरोग रुग्णांना निक्षय मित्र पोषण आहार टोपलीचे वाटप प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे करण्यात आले. या वेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वंदनकुमार पाटील यांच्या हस्ते सिप्ला कंपनी व हेल्प एज इंडिया फाउंडेशन प्रशंसा प्रमाणपत्र व निक्षय मित्र प्रमाणपत्र याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी हेल्प एज इंडिया फाउंडेशनचे वॅलेरीयन पायस, राम नाईक, डॉ. निरंजन देशपांडे, सिप्ला फाउंडेशनच्या उल्का धुरी, सुनील मकरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद रोकडे, डॉ. सिमा पाईकराव, महेंद्र पिंगळे, राजेंद्र कसबे, संतोष भुजबळ, क्षयरोग लाभार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

### धोकादायक नारळाचे झाड हटविले



**मुरूड** : लेडी कुलसुम बेगम हॉस्पिटल येथील मागच्या व रस्त्यालगत ३५ ते ४० फूट उंचीचे सरळ नारळाचे झाड धोकादायक असल्याने ते तोडण्याकरिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांनानिवेदन देण्यात आले होते. संभाव्य धोका लक्षात घेत नगर परिषदेने हे झाड तोडून लोकांना मोठा दिलासा दिला आहे. मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी नगर परिषदेचे आभार मानले.

### वाढदिवसानिमित्त साहित्य वाटप



**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका व शाळा समिती व्यवस्थापन शिक्षण तज्ज्ञ कलावती शशिकांत पाटील यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त नगर परिषद शाळा क्र.२ येथे विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भास्कर पाटील, ज्येष्ठ नागरिक रामभाऊ गोरिवले, विजय चव्हाण, संजय पाटील, चिंतामणी महीला बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या. कलावती पाटील यांचा मुलगा हितेश पाटील यांनी आपली आजी कै. तारामती हरिश्चंद्र पाटील यांच्या नावाने देणगी जाहीर केली.

# चौक शहराला वाहतूक कोंडीचे ग्रहण

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक बाजारपेठेमधील होणारी रोजची वाहतूक कोंडी कधी सुटेल? असा प्रश्न पडला आहे. येथील रस्ता अरूंद असून अनेकदा रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे दुचाकी पार्किंग होत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे येथे वाहतूक पोलिसांची नेमणूक व्हावी, अशी मागणी होत आहे.



खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून चौक बाजारपेठ प्रसिद्ध आहे, तसेच शासकीय कार्यालय, बँक, दवाखाने, शाळा, महाविद्यालय, औद्योगिक वसाहतीसाठी जाणारे मार्ग असल्याने या ठिकाणी सातत्याने नागरिकांची ये- जा सुरू असते. त्यात येथील रस्ते अरूंद असून अनेकदा दोन्ही बाजूला अनधिकृतपणे वाहने पार्किंग होत असतात.

सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने अनेकदा वादाचे प्रसंग उद्‍भवतात. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नेमणूक करावी, अशी मागणी होत आहे.

# रेवदंड्याच्या सरपंच मनीषा चुनेकरांचे निलंबन कायम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच मनिषा मिलिंद चुनेकर यांच्याविरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३) चे कलम १४ ज (३) नुसार केलेल्या रेवदंडयातील कार्यकर्ते हर्षल घरत यांनी केलेला अर्ज जिल्हाधिकारी न्यायालयात ग्राह्य धरून त्यांना निलंबित करण्यात आले होते. या निर्णयाविरोधात सरपंच मनिषा चुनेकर यांनी कोकण विभाग अप्पर आयुक्तांकडे अपील केले होते. तेथेही रायगड जिल्हाधिकारी न्यायालयाचा निर्णय कायम ठेवण्यात आला. त्यानंतर सरपंच मनिषा चुनेकर यांनी मुंबई हायकोर्टमध्ये अपील केले होते. तेथेही निर्णय कायम ठेवल्याने अखेर सरपंच मनिषा चुनेकर यांचे निलबंन कायम करण्यात आले आहे.

रेवदंडा सरपंच मनिषा मिंलिद चुनेकर यांचे सरपंचपद रद्द करावे म्हणून हर्षल घरत यांनी ३/२०२०अन्वये रायगड जिल्हाधिकारी न्यायालयाकडे नोंदविला होता. त्यानुसार दोन्हीकडील बाजू तपासून १८ जानेवारी २०२१ रोजी सरपंच मनिषा मिंलिद चुनेकर या राहत असलेले त्यांच्या सासू सुगंधा भालचंद्र चुनेकर यांचे नावे असलेले घर हे सरकारी गुरचरण जागेत अतिक्रमण करून बांधल्याचे सिद्ध झाले होते. त्यानुसार मनिषा मिलिंद चुनेकर यांचे सरपंचपद रद्द करण्यात आले होते.

**हायकोर्टाकडूनही दिलासा नाही!**

कोकण विभाग आयुक्त यांचेकडे त्यांनी याचिका दाखल केली होती. तेथेसुद्धा जिल्हाधिकारी न्यायालयाचा निर्णय कायम ठेवण्यात आला. सरपंच मनिषा चुनेकर यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली. तेथेही रायगड जिल्हाधिकारी न्यायालय व अप्पर आयुक्त कोकण विभाग यांचे निर्णय कायम ठेवण्यात येऊन सरपंच मनिषा चुनेकर यांचे पद रद्द करण्यात आले आहे.

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास आंदोलन

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील पत्रकारांनी आपल्या लेखणीतून शहरातील भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत वारंवार नगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधल्यानंतरही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे येत्या आठ दिवसांत भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त नगरपालिकेने केला नाही, तर पेण तालुका पत्रकार, छायाचित्रकार प्रतिष्ठानतर्फे मुख्याधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

पेणमध्ये अनेक प्रभागांमध्ये भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. यामुळे अबालवृद्धांना रस्त्यावर चालणे कठीण झाले असून याबाबत नागरिक वारंवार तक्रारी करीत आहेत, परंतु नियमांचे बंधन असल्याचे कारण सांगून नगर परिषदेचे अधिकारी वेळ मारून काम करीत असतात. यामुळे जर एखादया नागरिकाचा जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येईल का? असा सवाल करण्यात येत आहे.

प्रभाग क्र. २मध्ये अनेक चिकन, मटण व मच्छी विक्रेत्यांची दुकाने असल्याने याठिकाणी दुकानदारही चिकन व मटणाचे शिल्लक असलेले तुकडे रस्त्यावर टाकत असल्यामुळे या भागात भटक्या कुत्र्यांची संख्येत वाढ झाली आहे. हे कुत्रे पादचारी नागरिकांच्या तसेच दुचाकीचालकांवर हल्ला करीत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

याबाबत नगरपालिका प्रशासनाने येत्या आठ दिवसांत या भटक्या श्‍वानांचा बंदोबस्त केला नाही तर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा पत्रकांरानी दिला आहे.

# सिकलसेल दिनी आजाराबाबत जनजागृती

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोर्ली-मांडलातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत जागतिक सिकलसेल साजरा करण्यात आला.

या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सौरभ घरडे, डॉ. अश्विनी लहाने, तालुका सिकल सेल शालिकराव पावरा, आरोग्य सहाय्यक, आरोग्यसेविका, आशावर्कर सहभागी झाल्या होत्या. शालीकराव पावरा यांनी सिकलसेल आजाराविषयी माहिती सांगताना सिकलसेल आजार म्हणजे काय, त्यावरील उपचार याबाबत मार्गदर्शन केले.

त्यामुळे फॉलिक ॲसिडच्या गोळ्या नियमित घेणे, दररोज ८ ते १० ग्लास नियमित पाणी पिणे, मासे, अंडी, संत्री, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये, शेंगा, झिंक असलेले पदार्थ खाणे आवश्यक आहे, अशी माहिती दिली.



# रोहा : १२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी उद्या सोडत

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३पर्यंत मुदत समाप्तीच्या १२ ग्रामपंचायतींच्या सार्वजनिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत बुधवारी (दि. २१) ग्रामपंचायत कार्यालयामध्ये काढण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा बोलविण्यात येणार आहे.

रोहा तहसीलदार किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली १२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. या ग्रामपंचायतीमध्ये विरझोली, खांबेरे, चणेरा, खारगाव, तांबडी बुद्रुक, न्हावे, येरळ, सानेगाव, आरे बुद्रुक, भातसई, कोकबन, नागोठणे आदी ग्रामपंचायतीचा समावेश आहे. ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.




# रोह्यात जलद गाड्यांना थांबा हवा!
## एक्स्प्रेस गाड्यांसाठी गाठावे लागतेय पनवेल

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या रोहा तालुक्यातील महत्त्वाचे समजले जाणारे रोहा रेल्वेस्टेशनवर जलद गाड्या थांबत नाहीत. त्यामुळे परजिल्ह्यात व परराज्यात जाण्यासाठी प्रवाशांना पनवेल गाठावे लागत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने पूर्वी थांबत असलेल्या जलद गाड्यांना पुन्हा रोहा येथे थांबा देण्यात यावा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

रोहा रेल्वेस्थानकातून सुरुवातीला पॅसेंजर गाड्या सुरू झाल्या. त्यानंतर मुंबईतून कोकणात व कोकणातून मुंबईकडे यासह अन्य राज्यात टप्प्याटप्प्याने जलद गाड्या सुरू झाल्या. सुरुवातीला काही जलद गाड्या सोबत साप्ताहिक गाड्या रोहा रेल्वेस्थानकात थांबू लागल्या. त्यामुळे रोहेकरांना या गाड्यांचा लाभ घेता येऊ लागला, परंतु कोरोना महामारीनंतर जलद गाड्यांचा थांबा रद्द करण्यात आला.



त्याचप्रमाणे पूर्वी नेत्रावती एक्स्प्रेस, तुतारी एक्स्प्रेस, इंदोर- कच्चेवली, दादर- तिरुवनंतपुरम, कोयमतुर- हिसार या गाड्या थांबत होत्या. या गाड्यांचा थांबा व्यावसायिकरित्या बंद करण्यात आले.

आज या गाड्या रेल्वे स्थानकात थांबतात, परंतु त्यांना तिकीट दिले जात नाही. जर या गाड्या तांत्रिकदृष्ट्या थांबवण्यात येत असतील तर या गाड्यांना तिकीटही देण्यात यावे व व्यावसायिक थांबा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. दुसरे महत्त्वाचे दिवा-सावंतवाडी ही गाडी आता जलद करण्यात आली आहे. याही गाडीला व्यावसायिक थांबा नाही.

त्यामुळे त्यांना तिकीट देण्यात येत नाही. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करून रोहा रेल्वेस्थानकात जलद गाड्यांना थांबा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# म्हात्रोळी स्मशानभूमीसाठी तीन दिवसांत पाहणी
## जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश; ग्रामस्थांचे उपोषण स्थगित

**अलिबाग : प्रतिनिधी**

म्हात्रोळी गावाच्या स्मशानभूमिसाठी तीन दिवसांत स्थळपाहणी करण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सोमवारी (दि. १९) आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी आपले उपोषण स्थगित किले.

म्हात्रोळी गावासाठी सारळ ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. १७७, जुना गट नं. २६०, क्षेत्र ०.०७.०० हे. आर. स्मशानभूमीसाठी राखीव आहे, परंतु चौथरा बांधण्यासाठी शासनाकडून लेखी परवानगी व पोलीस संरक्षण मिळत नाही. त्यामुळे म्हात्रोळी ग्रामस्थांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. म्हात्रोळी ग्रामस्थांच्या उपोषणकर्त्या ग्रामस्थांना समाज क्रांती संघटनेने पाठिंबा दिला होता.

आमदार महेंद्र दळवी यांच्या मध्यस्थीने जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेत त्यांना तीन दिवसांत स्थळपाहणीचे आश्वासन दिले आहे. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनानंतर म्हात्रोळी ग्रामस्थांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.



# वडवल धवली येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या वतीने वडवल धवली येथील १०मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव आला तसेच राज्यस्तरीय स्पर्धेत कुस्तीगीर यांचा रविवारी (दि. १८) सत्कार करण्यात आला. माध्यमिक विद्यालय वडवल शाळेचा १०० टक्के निकाल लागल्यामुळे शिक्षकवर्गाचा ही सत्कार करण्यात आला.

या वेळी माजी उपसभापती वत्सला मोरे, सरपंच ज्ञानेश्वर सुतार, माजी सरपंच जितेंद्र सकपाळ, सदस्या यशोदा मोरे, सुरेश संकपाळ, जगदीश मरागजे सदस्य, किसन सकपाळ, माजी उपसरपंच लक्ष्मण मरागजे, सुवर्णा शिंदे, श्वेता कुंभार, पांडुरंग चाळके, सदस्य श्यामकांत सावंत, संजय कदम, बूथ अध्यक्ष अक्षय सकपाळ, सचिन मोरे, दीपक चाळके, अंकुश चाळके, विष्णू चाळके, प्रकाश चाळके, सचिन मरागजे, रवींद्र मरागजे, देवजी मराजगे, आनंद मरागजे, शांताराम मरागजे, दत्ताराम मरागजे, बाळकृष्ण सकपाळ, निलेज मरागजे, दीपक सावंत, शंकर शिंदे, हनुमंत सकपाळ, हरेश जाधव, किसन चाळके, संजय चाळके, दिनेश मोरे, किरण शेलार, निलेश मरागजे, पैलवान संदेश मरागजे आदींसह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. प्रतिक मिलिंद कोरडे यांचे कडून विकत घेण्याचा विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिखले, तालुका पनवेल, जिल्हा रायगड,**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| 19 | 2अ | 0- 15 - 80<br>पो.ख. 0- 00 - 00<br>एकूण 0- 15 - 80 | 3 रु. 12 पै. |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ, अथवा, अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '7 दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहित व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. विजय रामराव सुरडकर,**
पनवेल
दि. 20/06/2023
**पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**

### EXTENSION TO E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027658**<br>**Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-32/2023-2024.<br>Extension to RFx E-tender for AMC for Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220kV Taloja, Uran and ONGC Panvel Substation under EHV (O&M) Division, Panvel.<br>**Tender Amount:** Rs. 23,00,000/-<br>**EMD Amount:** Rs. 23,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 20.06.2023, 17:00 Hrs to 27.06.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 27.06.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 28.06.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **१) श्री. प्रमोद कृष्णा शेळके, २) विनोद पंढरीनाथ म्हात्रे पत्ता - मु विंधणे, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे/जमिन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे कळंबुसरे, ता. उरण, जि. रायगड**

| भोगवटा धारकाचे नाव | गट क्र. उपविभाग | क्षेत्र. हे.आर. चौ. मी | आकार |
|---|---|---|---|
| वसंत भास्कर राऊत | ११८/३ | ०-०६-८० | ०.७८ |
| वसंत भास्कर राऊत | ११८/८ | ०-०९-४० | ०.९४ |
| एकूण १६.२ गुंठे | | | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/ भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **श्री. वसंत भास्कर राऊत** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्या जवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पूर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक :- १५/०६/२०२३

सही/-
**ॲड. अतिश सुनिल परदेशी**
**ॲड. हायकोर्ट**
गाळा नं. ७, फडके नाटयगृह कॉम्प्लेक्स, श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, मोबा. नं. ९७०२८९८९८९

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. बाबुराव लक्ष्मण चोरघे यांचे कडून विकत घेण्याचा विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – लोणिवली, तालुका – पनवेल, जिल्हा रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| 141 | 8 | 0- 42 - 60<br>पो.ख. 0- 01 - 30<br>एकूण 0- 43 - 90 | 7 रु. 93 पै. |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ, अथवा, अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '14 दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहित व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.योगेश अनंता फुलोरे,**
पनवेल
दि. 20/06/2023
**पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**

# नेरूळ रेल्वेस्थानकात भिकाऱ्यांचा अड्डा

## कारवाई करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला आहे, तसा नेरूळ रेल्वेस्थानकात दिवसा व रात्रीच्या वेळी रेल्वे स्थानकाच्या परिसरामध्ये आणि फलाटावर भिकारी व बेघरांचा वावर वाढला आहे. या बेघरांनी रेल्वेस्थानकात व परिसरात ठाण मांडल्यामुळे येणारे-जाणारे प्रवासी व रेल्वे स्थानकात गाळे असलेले दुकानमालकदेखील हैराण झाले आहेत. यावर रेल्वे पोलीस आणि सिडको सुरक्षा रक्षकांनी कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.




नेरूळ रेल्वेस्थानकाच्या बाहेर रात्रीच्या वेळी रेल्वे स्थानक परिसर महिला प्रवाशांकरिता असुरक्षित ठरत आहे. दरम्यान, रेल्वे पोलिसांकडून कोणतीही प्रतिबंधात्मक कारवाई होताना दिसत नाही. नवी मुंबई शहरातील सर्वच रेल्वे स्थानकात आणि परिसरात भिकारी, बेघर यांनी आपले संसार थाटले आहेत. नेरूळ रेल्वेस्थानकात रात्री ९ ते १० वाजले की फलाट आणि तिकीट खडकीजवळ भिकारी व बेघर आपले बस्तान मांडतात. काही जण दिवसभर आपले ठाण मांडून असतात. त्याच ठिकाणी जेवण करून अस्वच्छता करतात. फलाटावरसुद्धा अंथरूण टाकून झोपलेल्याचे दृश्य पाहावयास मिळते. दरम्यान, आधुनिक काळात नोकरदार महिलांना रात्री उशिरा प्रवास करावा लागतो. रेल्वे डब्यांमध्ये महिलांना सुरक्षा पुरवली जाते, मात्र रेल्वेस्थानक परिसर आणि फलाटावर सुरक्षा रक्षक नसल्याने असुरक्षेची भावना त्यांच्यात आहे. रात्रीचा प्रवास करणाऱ्या महिलांना मद्यपी व गर्दुल्ले यांच्याकडून त्रास होत असतो.

याबाबत अनेकदा वेळेअभावी प्रत्यक्ष तक्रार होत नसल्याने रेल्वे पोलीस कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करतात, असे प्रवाशांकडून बोलले जात आहे. रेल्वे स्थानकाबाहेर बकाल पणा आला असून वेगवेगळे गैर प्रकार घडत असून भांडण तंटे, शिवीगाळ असे अनेक प्रकार सरार्सपणे सुरू असल्याने कारवाईची मागणी होत आहे.

**रेल्वे पोलीस दल आणि सिडको सुरक्षा रक्षक अशा घटकाविरोधात वारंवार कारवाई करित असते. नेरूळ रेल्वेस्थानक परिसरात उपद्रव करणार्यांवर कारवाई करावी असे सिडको प्रशासनास लेखी स्वरुपात कळविले आहे.**

**-एस. एम. नायर, स्टेशन अधिक्षक, नेरूळ रेल्वे स्टेशन**

# मोदी @ ९ अंतर्गत व्यापारी संमेलन

## आमदार मंदा म्हात्रे यांनी केले मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

मोदी @ ९ महाजनसंपर्क अभियानांतर्गत बेलापूर विधानसभा क्षेत्रात रविवारी (दि. १८) आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्फत सीबीडी येथील वारकरी भवन येथे व्यापारी संमेलन व स्नेहभोजन या कार्यक्रमाची सुरुवात नवी मुंबईचे प्रभारी अतुल कलसेकर व व्यापारी अध्यक्षांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.



भाजप महामंत्री तथा बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे यांनी दैनंदिन नोंद वही देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. तसेच आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यापारांशी संवाद साधत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९ वर्षांत केलेल्या लोकहितांच्या कामाचा अहवाल सांगितला. तसेच गेल्या ९ वर्षांत व्यापारांना ज्या ज्या सोयी-सुविधा प्राप्त झाल्या आहेत त्याचा आढावा या संमेलनाद्वारे घेतला असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

### 'महत्त्वाकांक्षी निर्णय कार्य अहवालातून मांडणार'

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलदगतीने घेतलेले महत्वाचे निर्णय की ते व्यापारी बांधवांचे असो किंवा महिलांचे असो वा शेतकऱ्यांचे असो किंवा कामगारांचे असतील विविध विषयावरील आरोग्य विषयासंदर्भात असतील अश्या अनेक ७० ते ८० महत्त्वाकांक्षी निर्णय आज नरेंद्र मोदीजी यांनी घेतले आहेत. ते आज आम्ही जनतेच्या घरा घरापर्यंत पोहचविण्याचे कार्य आम्ही या ९ कलमी कार्यक्रमाद्वारे करत आहोत. या निर्णयाचा व्यापारांना व जनतेला कसा फायदा होईल व यामुळे जास्तीत जास्त गोरगरीब तसेच विविध समाजातील जनता कशी जोडली जातील हे आम्ही या आज ९ वर्षाच्या केलेल्या कार्यअहवालातून करत आहोत, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.**

त्या पुढे म्हणाल्या की, सर्व समाजातील व्यापारांना इतका आंनद झाला की, कुठेतरी प्रथमतः आम्ही सर्व व्यापारी बांधव एकत्र येऊन सर्वांशी चर्चा करून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९ वर्षात केलेली कामे व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात झालेली विकास कामे यांचाही आढावा आज या संमेलनात घेतला.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, हे सर्व जमलेले व्यापारी बांधव आहेत ते आत्ताचे नसून मी पहिल्यांदा नगरसेविका झाल्यापासून ते माझ्या खांद्याला खांदा लावून माझ्या सोबत आहेत. तसेच अजून असे भरपूर व्यापारी आहेत ते माझ्या सोबत आहेत. व्यापारी वर्गामधील अत्यंत गरीब वर्ग हा माथाडी वर्ग असून त्यांचाकरिता कोरोना काळात लसीकरणाची आवश्यकता असल्याने मी त्यांना अवघ्या काही तासाच्या आत लसीकरण केंद्र प्रत्येक मार्केटमधील विविध ठिकाणी उपलब्ध करून दिले. तसेच सीबीडी येथील गुरुद्वारा असो किंवा अश्या अनेक व्यापारी संस्था असो यांनाही कोरोना काळात लसीकरण व औषधे उपलब्ध करून दिले.

आमदार मंदा म्हात्रे यांज समवेत ग्रोमा असोसिएशन अध्यक्ष शरदकुमार मारू, नवी मुंबई व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रमोद जोशी, हरियाणा वेल्फेअर असो. अध्यक्ष बलवीर चौधरी, केमिस्ट असो. चे अध्यक्ष सुनील छाजर, गुरुद्वारा प्रबंधकचे अध्यक्ष जसबीर सिंग, नवी मुंबई हॉटेल असो. चे अध्यक्ष दयानंद शेट्टी अश्या विविध समाजाचे व्यापारी वर्गाचे अध्यक्ष, माजी महापौर जयवंत सुतार, भाजपा जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही. रेड्डी, आय.टी. सेलचे अध्यक्ष सतीश निकम, महामंत्री विजय घाटे, माजी नगरसेवक दीपक पवार, डॉ. जयाजी नाथ, अशोक गुरखे, साबू डॅनीयल, गोपाळराव गायकवाड, भगवान ढाकणे, राजेश रॉय, विकास सोरटे तसेच मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते.

# विविध कामांबद्दल रिपाइं शिष्टमंडळाचे निवेदन सादर

**नवी मुंबई : बातमीदार**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)चे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशाने नवी मुंबई जिल्ह्याच्या शिष्ट मंडळाने जिल्हा प्रभारी प्रकाश पवार-गोळवसकर यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई पालिका आयुक्तांची विविध सामाजिक समस्यांबाबत भेट घेतली.



या वेळी विविध नागरी कामावर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर विविध मागण्यांचे लेखी निवेदन दिले. त्यावर सकारात्मक चर्चा झाली व पुढील कार्यवाही करण्याचे आयुक्तानी आश्वासन दिले. जिल्हा संघटन सचिव सुदत्त खरात, संपर्कप्रमुख प्रतीक यादव व सरचिटणीस निवास साबळे हे उपस्थित होते.

या निवेदनात नवी मुंबईमध्ये प्रकल्पग्रस्त समाजाचे नेते दि. बा. पाटील स्मारक उभारावे, नेरूळ पूर्व येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे बाबासाहेबांचा पुतळा उभा करावा, नेरूळ पूर्व येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात लवकरात लवकर शिवाजी महाराजांचा पुतळा लावण्यात यावा, नेरूळ सेक्टर १० मधील कै. अण्णासाहेब पाटील उद्यान येथील शोचालय उद्यानामध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी चालू करावे, नेरूळ सेक्टर १० मधील कै. अण्णासाहेब पाटील उद्यान येथे अभ्यासासाठी ग्रंथालय उभा करावे आदी मागण्याचे निवेदन लेखी स्वरूपात दिले.

# वाशीत स्वच्छंद काव्य संगीत संध्या कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छता विषयक जाणीवांना नवी झळाळी देण्याच्या दृष्टीने वैष्णो व्हिजन या कलासंस्थेच्या माध्यमातून शुक्रवारी (दि. २३) विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे सायंकाळी ६.३० वा. मान्यवर साहित्यिक, कलावंतांच्या सहभागाने 'स्वच्छंद काव्य संगीत संध्या' आयोजित करण्यात आलेली आहे.

'स्वच्छंद काव्य संगीत संध्या' मध्ये सुप्रसिध्द कवी प्रा. अशोक बागवे, अरुण म्हात्रे, डॉ. महेश केळुसकर यांच्या एकाहून एक सरस कवितांचा आस्वाद रसिकांना घेता येणार असून त्यासोबतच 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या मराठी अभिमान गीताचे संगीतकार कौशल इनामदार यांच्या सुश्राव्य गीत-संगीताचा लाभही मिळणार आहे. याव्दारे काव्य आणि संगीताचा दुग्धशर्करा योग नवी मुंबईकर नागरिकांना कवितांचा ऋतू म्हणून ओळखल्या जाणा-या पर्जन्य ऋतूमध्ये अर्थात पावसाळी कालावधीत घेता येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिध्द निवेदिका अस्मिता पांडे करणार असून, मुंबई दूरदर्शनचे माजी निर्माते जयू भाटकर यांच्या वैष्णो व्हिजन मार्फत या कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे.

नवी मुंबईकर रसिक नागरिकांसाठी नामवंत कवी व संगीतकरांनी सजविलेली ही साहित्य - संगीताची मेजवानी विनामूल्य असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## निवडक

### वाशिवलीत ४३ हजारांचा गुटखा जप्त

**मोहोपाडा :** वाशिवली येथील एका पानटपरीवर बेकायदा



गुटख्याची विक्री होत असल्याची खबर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस हवालदार संदीप पाटील यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने छापा मारून ४३ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. शासनाने तंबाखू पदार्थाची निर्मिती, विक्री करण्यास प्रतिबंध केला असतानाही पंकज यादव गुटखा विकत असल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पान टपरीचालक पंकज हरीद्र यादव (वय २९) याच्यावर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एपीआय गोरक्षनाथ बालवडकर हे करीत आहेत.

### कोपरखैरणे येथे योग दिन

**नवी मुंबई :** माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट) कोपरखैरणे, येथे २१ जून या जागतिक योगदिनाचे औचित्य साधून सर्व कर्मचारी व अधिकारी तसेच माथाडी कामगार व त्यांचे कुटुंबिय व जनतेमध्ये योगाबद्दल जागरुकता यावी यासाठी शिबिर बुधवारी (दि. २१) दुपारी २ ते ४. वाजेपर्यंत सेमिनार हॉल कोपरखैरणे आयोजित येथे करण्यांत आले आहे. योग दिन - योगा अभ्यास वर्ग असणार आहेत. यात अशिष धुमाळ, योगा शिक्षक यांचे मार्गदर्शन तर ब्रेस्ट कॅन्सर जनजागृतीबाबत डॉ. करिष्मा किर्ती यांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

# नवी मुंबईतील ६३ चौकांचे काँक्रीटीकरण पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील चौकांमध्ये होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी चौकासभोवतालचे रस्ते काँक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. चौकांचा प्राधान्यक्रम लक्षात घेऊन हे काम नवी मुंबई महापालिकेने सुरू केले असून आत्तापर्यंत ८८ पैकी ६३ चौकांचे काम पूर्ण झाले आहे.

यामध्ये बेलापूर विभागात सात, नेरूळ विभागात २१, वाशी विभागात चार, तुर्भे विभागात १०, कोपरखैरणे विभागात तीन, घणसोली विभागात १४, ऐरोली विभागात चार अशा एकूण ६३ चौकांचे काँक्रिटीकरण पूर्ण झालेले आहे. नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार पावसाळा कालावधीपूर्वी हे काम गुणवत्ता जपत पूर्ण करण्यात आलेले आहे.

यामधील उर्वरित १५ चौकांचे काम पावसाळा कालावधीच्या



### खड्डा आढळल्यास तक्रार करा

**खड्डेमुक्त रस्ते आणि चौक ही संकल्पना नजरेसमोर ठेवून सन २०१२-१३ मध्ये सुप्रिम कोर्टाने मुंबई महानगर प्रदेशातील शासकीय प्राधिकरणांना व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या निर्देशानुसार नवी मुंबई महापालिकेने याकडे विशेष लक्ष दिले आहे. यादृष्टीने कुठेही खड्डा आढळल्यास तो त्वरित दुरुस्त करण्यासाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीचे कंत्राट कार्यान्वित केले आहे. ही बाब तक्रार निवारण प्रणालीशी संलग्न करण्यात आली असून ८४२४९४८८८८ हा व्हॉट्सॲप क्रमांक नागरिक संपर्कासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.**

अनुषंगाने थांबविण्यात आले होते. तथापि नवी मुंबई वाहतुक पोलीस विभागाशी झालेल्या चर्चेनुसार या कामाची गरज लक्षात घेता व पावसाळ्यानंतर लगेचच नवरात्र. दसरा, दिवाळी अशा सण, उत्सवांचा कालावधी लक्षात घेता पावसाळी कालावधीत पावसाला जरा उघडीप प्राप्त झाल्यानंतर हे चौक काँक्रिटीकरणाचे काम करणे शक्य आहे. या कालावधीत काँक्रिटचे क्युरींगही व्यवस्थित होते हे लक्षात घेत पाऊस जरा कमी झाल्यावर हि कामे करावीत, असे सूचित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका तपासणी करीत असून त्यानुसार कोणत्या कालावधीत पावसाळ्यामध्ये काम करणे शक्य आहे याचा मागोवा घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उर्वरित १० चौकांच्या काँक्रिटीकरणाची कामे पावसाळ्यानंतर करण्यात येणार आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने चौक काँक्रिटीकरणाची कामे गतीने पूर्ण करण्यात येत असून त्यामध्ये नागरिकांना रहदारीसाठी तसेच वाहतुकीसाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. शहरात ठिकठिकाणी झालेल्या चौकाच्या काँक्रिटीकरण कामांमुळे पावसाळ्यातही वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे, असे शहर अभियंता संजय देसाई यांनी सांगितले आहे.

# 'अंनिस'चा समविचारी संघटनेशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंनिस नवी मुंबई जिल्ह्यातर्फे तर्कशील सोसायटी पंजाब या समविचारी संघटनेतील पदाधिकाऱ्यांशी संवाद करण्यात आला. संवादसत्र रविवारी (दि. १८) या कालावधीत झाले. नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे संवादसत्र झाले.



तर्कशील सोसायटी पंजाब, या समविचारी संघटनेच्या राज्य कार्यकारी समितीचे सोशल मिडिया प्रभारी संदीप भोजा यांच्याशी संवाद करण्यात आला. त्यांना महाराष्ट्र अंनिसची स्थापना व संघटनेच्या विविध पातळ्यांवर चालणाऱ्या कामाची ओळख करून देण्यात आली. जादूटोणाविरोधी कायद्यामुळे महाराष्ट्रात चमत्काराचा दावा कोणी करत नाही. या कायद्याच्या प्रचार व प्रकारामुळे अंधश्रद्धेतून फसवणूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होऊन शिक्षा झालेल्या आहेत. 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या संघटनेच्या मुखपत्राची माहिती देण्यात आली.

प्रबोधन हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून हे मासिक छापले जाते. या मासिकाचे वाचक त्यांचे एक एक पाऊल विज्ञानाच्या दिशेने टाकत असतात. संदीप भोजा यांनी तर्कशील सोसायटीच्या कामाचे स्वरूप सांगितले. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात आपण परस्परांच्या संपर्कात राहून काम करूया, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

या संवाद सत्रात सहभागी कार्यकर्ते गजानंद जाधव, महेंद्र राऊत, प्रदीप कासुर्डे, अरूण जाधव व अशोक निकम उपस्थित होते.

# 'बालग्राम'मध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या बांधनवाडी येथील कार्यालयात बालग्राम प्रकल्पातील बालकांना शैक्षणिक साहित्य व मासिक किराणा सामान वाटप कार्यक्रम झाला.



ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून समाजातील अनाथ, गरीब, वंचीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता बालग्राम प्रकल्प राबविला जातो. या कार्यक्रमाला ॲड. राम नात्ति, सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील घरत, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत म्हात्रे, रोहित नात्ती, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, कंपास, छत्री, वह्या, पुस्तक, पेन, पेन्सिल इत्यादी शैक्षणिक व महिन्याभरासाठी लागणारे तांदूळ, कडधान्य, तेल, मीठ, पेस्ट यासारखे किराणा सामान वाटप उपस्थित पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. सामानासाठी कोकण कट्टा विलेपार्ले, मेघा पाटील पेण, डॉ. आर. के. लोखंडे पेण, सौ. सुप्रिया कुलकर्णी विलेपार्ले, ॲड. राम नात्ती पनवेल, स्वप्नील घरत यांनी सहकार्य केले त्यांचेही संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

सूत्रसंचालन व आभार राजेश रसाळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बालग्राम मित्र सचिन पाटील, मानसी पाटील, राजू पाटील, स्मिता रसाळ, अर्पिता पाटील, प्रशांत सोमासे, जय डगर यांनी अथक मेहनत घेतली.

# नवी मुंबईत करिअर मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वराज्य संघटना नवी मुंबई तर्फे रविवारी करिअर मार्गदर्शन शिबिर नेरूळ सेक्टर १८ येथे झाले. या वेळी उपस्थित डॉ. सत्यवान हाणेगावे यांनी विद्यार्थ्यांना करिअर कसे निवडावे यावर मार्गदर्शन केले. तसेच करियर निवड ही आपल्या जीवनात कशी महत्वाची आहे. त्याचप्रमाणे पालकांनीदेखील आपल्या पाल्याला योग्य आवड असलेल्या क्षेत्रात कसे प्रोत्साहित करावे, याबाबत माहिती दिली.

स्वराज्य संघटना, नवी मुंबईचे जिल्हा उपाध्यक्ष



स्वप्निल घोलप हयानी प्रस्तावना मांडताना करिअर निवड हा आपल्या जीवनातील टर्निंग पॉइंट आहे, योग्य करियर निवडने हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या भविष्याचे, कुटुंबाचे आर्थिक दृष्ट्या फायद्याचे आहेच, परंतु अप्रत्यक्षरित्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला फायद्याचे आहे, असे सांगितले.

याचप्रमाणे, स्वराज्य संघटना महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष अंकुश कदम यांनी विद्यार्थी आणि पालक वर्गाला आपल्या पाल्याला योग्य संगति, त्याच्या आवड़ीनिवडी जोपासन्यासाठी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला स्वराज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य, अंकुश बाबा कदम, स्वराज्य जिल्हाध्यक्ष नवी मुंबई उमेश जुनघरे, स्वराज्य जिल्हा उपाध्यक्ष नवी मुंबई स्वप्निल घोलप, आणि सागर पावगे, संजय सपकाल, मधुसूदन सोलंके, अमोल निंबालकर तसेच नवी मुंबईचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# बेणसे शाळेला शिक्षकांची प्रतीक्षा

## एकाच शिक्षिकेवर पहिली ते सातवीच्या वर्गांचा भार; पालकही चिंतेत

**पाली : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील बेणसे शाळेची इमारत प्रशस्त, सुसज्य अन् देखणी आहे, मात्र शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांची लेखणी इथे खुंटतेय असे म्हणण्याची नामुष्की ओढवली आहे. पहिली ते सातवी इयत्तेपर्यंत इथे शाळा भरते. येथील एकूण विद्यार्थी पटसंख्या ८२ आहे, मात्र या शाळेत सर्व विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी एकाच शिक्षिकेवर येऊन पडली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचेही नुकसान होत आहे आणि शिक्षिकेचीही ओढाताण होत आहे.



विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन देण्याबरोबरच शाळा सोडल्याचे दाखले व इतरही कामे या शिक्षिकेला करावी लागतात. त्यामुळे बेणसे शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारमय झाले असून पालक चिंतातुर झालेत. रिक्त असलेल्या तीन जागा जलद भराव्यात अशी मागणी जोर धरतेय. या शाळेतील एकमेव शिक्षिका व मुख्याध्यापिका अशा दोन्ही जबाबदारी सांभाळणाऱ्या सुचिता आंबरे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. त्या आजारी पडल्या अथवा तातडीचे काम आले तर शाळेत दुसरे कुणीच शिक्षक नसल्याने शाळेला कुलूप लावण्याशिवाय पर्याय उरत नाही. या शाळेत पूर्वी एकूण चार शिक्षक कार्यरत होते. आजघडीला एक शिक्षक निवृत्त, तर दोन शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. सध्या केवळ एकच शिक्षक सेवेत आहे.

बेणसे शाळेत बेणसे, बेणसे सिद्धार्थनगर, मोहल्ला, झोतिरपाडा, शेतजुई, बेणसे वाडी येथील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत आहेत. त्यामुळे पहिली ते सातवी इयत्तेपर्यंत ८२ विद्यार्थी पटसंख्या आहे. आणि या सातही वर्गांना शिकवण्यासाठी केवळ एकच शिक्षिका आहेत. घरात पालकांना एक दोन मुले सांभाळणे कठीण होते. त्यात शिक्षकाकडे ८२ विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी, मग कसे होणार? असा सवाल उपस्थित केला जातोय. ८२ विद्यार्थी एकत्र आले की, गोंधळ उडतो, त्यांना कुठे व कसे बसवावे, धडे कसे शिकवावेत, एक शिक्षक या सर्वांवर नियंत्रण कसे ठेवणार?असे अनेक प्रश्न पालकांसमोर उभे आहेत.

आज विद्यार्थी आहेत तर शिक्षक नाहीत अशी परिस्थिती आहे. यासंदर्भात सुचिता आंबरे यांनी पालकांची बैठक लावून वस्तूस्थिती मांडली आहे. सद्यस्थितीत शिहू शाळेतील एक शिक्षिका तात्पुरत्या मदतीला धावल्या आहेत. येथील शिक्षकांच्या रिक्त जागा जलद भरल्या नाहीत, तर पालक आपली मुले इतर शाळेत पाठवतील व जिल्ह्यात बंद पडणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेत दुर्दैवाने बेणसे शाळेचादेखील नंबर लागेल, यासाठी शाळा वाचविण्यासाठी माजी विद्यार्थी व विभागातील सुजाण नागरिक पुढाकार घेतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## निवडक

### नीड विकास संस्थेतर्फे साहित्यवाटप



**माणगाव** : नीड विकास संस्थेच्या माध्यमातून शनिवारी (दि. १७) राजिप आमडोशी शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्यवाटप करण्यात आले. या वेळी संस्थेच्या अध्यक्ष सारिका यादव, सचिव कमलेश सामंततुला, खजिनदार विजय आगावणे, पोलीस पाटील संजय वाघ, मुख्याध्यापक प्रकाश उभारे, संजय आरसे, शाळा कमिटी अध्यक्ष प्रियंका घुलघुले, मोतीराम घुलघुले, एकनाथ शिगवण, श्रीराम कदम, सुनील शिगवण, रवींद्र सकपाळ, अनंत सकपाळ, हनुमंत सकपाळ, विनोद घुलघुले, दिनेश काशिम, दिनेश निकम, सुशील कदम, सुधीर कदम आदी उपस्थित होते.

### निजामपूर येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन



**माणगाव** : ग. रा. मेथा माध्यमिक विद्यालय निजामपूर येथे शनिवारी (दि. १७) शाळा समिती सदस्य नितीन बडे यांनी त्यांचे वडील समाजसेवक कै. हभप ल. स. बडे यांच्या स्मरणार्थ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. प्रमुख मार्गदर्शक कनिष्ठ अनुवाद अधिकारी मुंबई सीमा शुल्क सत्यवान यशवंत रेडकर यांनी विविध शासकीय परीक्षा, त्यासाठी आवश्यक पात्रता, नियोजन आदी बाबींची सखोल माहिती दिली. शिबिरासाठी माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष दत्तू पवार, चेअरमन दत्ता नाडकर, संदीप मोदी, शरद मेथा, टिकम मेथा, नितीन जाबडे, पवन कोळवणकर, इंग्रजी माध्यमाचे अध्यक्ष रहिमत परदेशी, मुख्याध्यापक कापरे, पर्यवेक्षक ठेंगील उपस्थित होते.

### ‘शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी’

**मुरूड** : पंतप्रधान किसान सन्मान योजनेंतर्गत तालुक्यातील जे शेतकरी लाभ घेत होते त्यातील काही शेतकऱ्यांनी ई-केवायसी केलेली नसल्याने अशा शेतकऱ्यांची यादी सर्व ग्रामपंचायत व महा ई-सेवा केंद्रधारकांना देण्यात आलेल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केलेली नाही त्यांनी संबंधित ग्रामपंचायतीतील ग्रामसेवक, कृषी सहाय्यक किंवा महा ई सेवा केंद्रात ई-के.वाय.सी.करुन घ्यावी, असे आवाहन महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे यांनी केले आहे. त्याचप्रमाणे मोबाईलवर पीएम किसान सन्मान योजनेच्या ई-केवायसी करण्यासाठी पीएम किसान ॲप गुगल प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करून केवायसी अपडेट करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गुन्हा दाखल होताच चार तासांत आरोपी मुद्देमालासह ताब्यात

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील रिलायन्स कंपनीच्या संरक्षण भिंतीवर चढून कंपनी आवारात स्टोअर करून ठेवलेली तांब्याची वायर सुमारे ३५ किलो वजनाची चोरी झाल्याची तक्रार शलम प्रदिपकुमार शराधिनावर यांनी कंपनीच्या वतीने नागोठणे पोलीस ठाण्यात शुक्रवारी (दि. १६) दिली होती. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी चार तासांतच मुद्देमालासह आरोपीला ताब्यात घेतले.



नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्हाचा तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांच्याकडे देण्यात आला होता. हवालदार संदेश सानप, संतोष म्हात्रे, सचिन भोईर, कॉन्स्टेबल रामनाथ ठाकूर यांच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या चार तासांत आरोपी गोविंद बंडू वाघमारे, अजय शांताराम वाघमारे (कोंडगाव आदिवासीवाडी) व किरण नरेश पवार (कांदले आदिवासीवाडी पेण) यांना मुद्देमालासह शिताफिने अटक केली आहे.

## खोपोली रेल्वेस्थानकाजवळ रस्त्याचे डांबरीकरण

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली रेल्वेस्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची गेल्या दोन वर्षांपासून अशरशः चाळण झाली होती. पावसाळ्यात येथील खड्ड्यात पावसाचे पाणी साचून डबके तयार होत होते. याबाबत गेल्या एक महिन्यापासून खोपोली शहर भाजप अध्यक्ष रमेश रेटरेकर यांचे माध्यमातून शिष्टमंडळाने भेट घेत पाठपुरावा केला. अखेर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू झाल्याने प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.



भाजपच्या पाठपुराव्याला यश

गेल्या दोन वर्षांपासून रेल्वेस्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची दूरवस्था झाली होती. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने या रस्त्यावरून प्रवाशांना आपला जीव धोक्यात टाकून प्रवास करावा लागत असल्याने सर्वत्र नाराजीचा सूर उमटत होता. याबाबत भाजपच्या वतीने आक्रमक भूमिका घेत रेल्वे प्रशासनाला अंदोलनाचा इशारा दिला होता. त्याचप्रमाणे अध्यक्ष रमेश रेटरेकर, शहर सेक्रेटरी हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, दिलीप पवार, अजय इगूळकर आदींनी रस्ता डांबरीकरण न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. अखेर रेल्वे प्रशासनाने या दोन्ही अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण केल्याने समाधान व्यक्त केले आहे.

# नागोठण्यासह किल्ला ग्रामपंचायतीचे सरपंच, कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**नागोठणे : बातमीदार**

आम्ही प्रत्येक कार्यकर्ता हा आपला माणूस आहे या भूमिकेतून काम करीत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी, गरीब, कष्टकरी, सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी दिवसरात्र काम करीत आहेत. आम्ही विकासकामांसाठी नागोठणे विभागात ८८ लाख रुपये निधी दिला असून त्यातील ५५ लाख रुपये निधी नागोठण्यासाठी दिला आहे. नागोठणेकरांना जेव्हा जेव्हा निधी लागेल तेव्हा तेव्हा निधी उपलब्ध केला जाईल, अशी ग्वाही शिवसेनेचे प्रवक्ते आमदार भरत गोगावले यांनी दिली. रायगडचा पुढील खासदार आपलाच असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नागोठणे विभागातील कोंडगाव ग्रामपंचायत हद्दीतील पायरवाडी, कातळावाडी, एकलघर येथील विविध पक्षातील कार्यकर्ते व रोहा तालुक्यातील किल्ला ग्रामपंचायतीचे सरपंच योगेश बामुगडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी रविवारी (दि. १८) शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार भरत गोगावले यांनी स्वागत केले.

या जाहीर प्रवेश सोहळ्यासाठी दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, रोहा तालुकाप्रमुख ॲड. मनोज शिंदे, विभाग प्रमुख प्रवीण ताडकर, उपविभाग प्रमुख आकाश मढवी, शहर प्रमुख अमित खांबकर, ऐनघरचे ज्येष्ठ सदस्य मनोहर सुटे, संजय नांगरे, प्रकाश मोरे, निवृत्ती जंगले, रोहा शहर प्रमुख मंगेश रावकर, युवासेना विभाग प्रमुख रोशन उमरे, विठ्ठल कदम, किसन मढवी, रोहा उपाध्यक्ष वर्षा सहस्त्रबुद्धे, पेण रोहा मतदारसंघ संघटिका सरिता पाटील आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश मोरे यांनी केले.

जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी सांगितले की, आमदार असावा तर भरत गोगावले यांच्यासारखा, असे कौतुक केले. तालुकाप्रमुख ॲड. मनोज शिंदे यांनी, रायगडातील तीनही आमदारांच्या कार्याचे कौतुक करून शिंदे फडणवीस सरकार राजकारण न करता समाजकारण करीत असल्याचा अभिमान व्यक्त केला, तसेच प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.



# नशामुक्त भारतासाठी पोलिसांचा पुढाकार

## रोहा येथे रॅली; नागरिकांमध्ये केली जागृती




**रोहे : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्याच्या वतीने शहरात नशामुक्त पंधरवडा अभियांनातर्गत तीनबत्ती नाका येथे मिनिडोर रिक्षा, चालक मालक यांच्या वतीने रॅली काढण्यात आली.

या रॅलीत मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी, कोणतेही नशा नागरिकांनी करू नये, असे सांगत शाळा, महाविद्यालय व आजूबाजूच्या परिसरात नशायुक्त पदार्थ विक्री होत असल्याचे दिसून आल्यास पोलिसांना कळवावे असे सांगितले. त्यांनी नशामुक्ती अभियानाचे महत्त्व समजावून सांगितले.

या वेळी पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, उपनिरीक्षक जवादे, रिक्षा संघटना अध्यक्ष लीलाधर मोरे, निडीतर्फे अष्टमी उपसरपंच उत्तम नाईक, कोळी समाजनेते नवनीत डोलकर, मिनीडोर संघटनेचे महेंद्र कांबळे, पोलीस पेढवी, हनुमंतराव धायगुडे, शरद कोटकर, तडवी, गुट्टे, रिक्षा संघटनेचे विनोद वाघमारे आदी उपस्थित होते.

### माणगावात पोलिसांसाठी आरोग्य शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस ठाण्यातर्फे आरोग्य शिबिर व जनजागृती रॅलीचे आयोजन शनिवारी (दि. १७) करण्यात आले होते.

या रॅलीत विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. यानंतर आरोग्य शिबिरात ३२ पोलीस अधिकाऱ्यांनी आरोग्य तपासणी करून घेतली. पोलीस अधिकाऱ्यांनी नशेपासून परावृत्त करणे शपथ घेण्यात आली. या वेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सतिष आस्वर, नितीन मोहिते, नवनाथ लहांगे, उपनिरीक्षक दिनेश आघाव, किर्तीकुमार गायकवाड आदी उपस्थित होते.

## मुरूडमध्ये शॉक लागून एकाचा मृत्यू

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील मिठागर येथे मत्स्यतलावामध्ये पाणी चालू बंद करण्याचा कॉक बंद करण्यासाठी गेलेला बुलाई धुलापाडा मुड्डी (वय २७, रा. चुपरीजिला, जयनगर पश्चिम बंगाल) याचा शॉक लागून मृत्य झाला. याबाबत माहिती मुरूड पोलीस ठाणे येथे मनोज विश्वनाथ खेतान (वय ५३, रा. श्री गणेश अंगण, सीएचएसली समता नगर, मुंबई) यांनी दिली.

मुरूडपासून १५ किमी अंतरावर असणारे मिठागर येथे मत्स्यतलाव आहे. या तलावामध्ये पाणी सोडण्यासाठी असलेला कॉक बंद करण्यासाठी बुलाई धुलापाडा मुड्डी हा गेला असता त्यास शॉक लागला. त्यास उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यास मृत घोषित केले.

## आरसीएफकडून सीएसआर अंतर्गत साडेसात कोटींचा निधी खर्च

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लिमिटेडने (आरसीएफ) २०२२-२३ या आर्थिक वर्षात विविध समाजोपयोगी उपक्रमांसाठी निर्गमित सामाजिक दायित्व (सीएसआर)अंतर्गत सात कोटी ५३ लाख एवढा निधी परिसरातील विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या मदतीसाठी खर्च करण्यात आला आहे. मानव संपदा व प्रशासन उपमहाव्यवस्थापक विनायक पाटील यांनी ही माहिती दिली.



आरसीएफ हा भारत सरकारचा अंगीकृत व्यवसाय असलेला प्रकल्प असून कंपनीद्वारे विविध उपक्रमांबरोबरच निर्गमित सीएसआर अंतर्गत थळ युनिटतर्फे कारखाना परिसरातील गावांमध्ये आरोग्यसेवा, शिक्षण, खेळ, ग्रामविकास, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, पर्यावरण रक्षण, अशा विविध स्तरावरील समाजोपयोगी उपक्रमांना नेहमीच मदतीचा हात दिला आहे.

थळ परिसरातील रस्ते दुरूस्ती, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, मोफत वैद्यकीय चिकित्सा , घंटागाड्यांचे वितरण, महिला सक्षमीकरण, शेतकऱ्यांना खते, बियाणे, भाताची रोपे, फळझाडांची रोपांचे वाटप, शैक्षणिक संस्थांना मदत, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व कारखान्याच्या परिसरातील प्राथमिक आरोग्यकेंद्रांना अद्यावत व सक्षम करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता करून देणे, आदिवासी उन्नयन, खेळांना प्रोत्साहन उपक्रमांचा समावेश आहे.

अनेक छोटे-मोठे उपक्रम तसेच सरकारी कार्यालयातील उपक्रमास पाठिंबा देऊन सक्षम करण्याचे काम आरसीएफने वारंवार केले आहे. पुढील काळातही आरसीएफ आपले सामाजिक उत्तरदायित्व निभावण्यास बांधील आहे, असे विनायक पाटील यांनी सांगितले.

# भवानी देवीने इतिहास रचला

## आशियाई चॅम्पियन्सशिपमध्ये तलवारबाजीत पदक जिंकले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या सीए भवानी देवी हिने तलवारबाजीमध्ये इतिहास रचला आहे. आशियाई फेन्सिग चॅम्पियनशीपमध्ये भवानीदेवीने सध्याच्या वर्ल्ड चॅम्पियनचा पराभव करीत भारताची मान उंचावली आहे. आशियाई फेन्सिग चॅम्पियनशीपमध्ये भवानी देवीने पदक पक्के केले. या स्पर्धेत पदक पक्के मिळवणारी भवानी देवी पहिली भारतीय तलवारबाज ठरणार आहे.

टोकियो ऑलम्पिकमध्येही भवानी देवीने शानदार कामगिरी केली होती, पण पदक मिळवण्यात तिला अपयश आले होते. आता तिने आशियाई स्पर्धेत यश संपादन केले आहे.

आशियाई फेन्सिग चॅम्पियनशीपमध्ये भवानी देवीने प्रभावी कामगिरी केली. क्वार्टर फायनलमध्ये भवानी देवीने जपानच्या मिसाकी इमूरा हिचा १५-१०च्या फरकाने पराभव करीत उपांत्य फेरीत आपली जागा पक्की केली. मिसाकी इमूरा तलवारबाजीत वर्ल्ड चॅम्पियन आहे. तिचा पराभव करीत भवानी देवीने जगभरात देशाची मान उंचावली. या विजयासह आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये भारताचे पदक पक्के झाले. भवानी देवीने आशियाई



फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये आपल्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित केले. तिने संपूर्ण सामन्यात वर्ल्ड चॅम्पियनवर वर्चस्व मिळवले. मिसाकीला भवानी देवीने सामन्यात कमबॅक करण्याची संधी दिलीच नाही.

भवानी देवीचे आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये आतापर्यंत दमदार प्रदर्शन राहिलेय. क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी तिने जापानच्या सिरी ओजाकी हिचा १५-११ असा पराभव केला होता. सिरी ही २०२२ वर्ल्ड चॅपियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या संघाची सदस्य होती.

आठ वेळा नॅशनल चॅम्पियन असणाऱ्या भवानी देवीने कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप टीम इवेंट्समध्ये एक रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले होते, तर याच चॅम्पियनशिपच्या इंडिव्हुजअल इवेंटमध्येही भवानीच्या नावावर एका कांस्यपदक आहे. भवानी देवीने २०१०च्या एशियन तलवारबाजी चॅम्पियनशिपमध्येही कांस्यपदक जिंकले होते.

आशियाई स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भवानी देवीला उझबेकिस्तानच्या झेनाब डेबेकोवाने पराभूत केले. या सामन्यात झैनाब देबेकोवाने भवानीचा १४-१५ असा पराभव केला, पण तरीही भवानी देवीने या स्पर्धेत भारतासाठी पहिले पदक निश्चित केले. त्यामुळे तिचे कौतुक होत आहे.

## राजस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईत २२ ते २४ जून या कालावधीत होणाऱ्या पुरुष व महिला पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनने रायगडचा संघ जाहीर करण्यात आला आहे.

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिशनचे सचिव अरुण पाटकर, माधव पंडित, राहुल गजरमल यांच्या निवड समितीने खेळाडूंची कामगिरी पाहून संघ जाहीर केला. यामध्ये ४७ किलो वजनी गट अमृता ज्ञानेश्वर भगत (आयनमेट जिम, खोपोली), ५७ किलो गटात सलोनी पद्माकर मोरे (चॅम्पियन स्पोर्ट्स अकॅडमी, महाड), १०५ किलो वजनी गट विक्रांत अनिल गायकवाड (आयनमेट जिम, खोपोली) आणि १२०+किलो वजनी गटात ऋतिक शिशिर पोळ (आयनमेट जिम, खोपोली) यांची निवड केली. या संघाचे व्यवस्थापक म्हणून सचिन भालेराव व सुभाष टेंबे (माणगाव), तर प्रशिक्षक म्हणून माधव पंडित व अरुण पाटकर काम पाहणार आहेत.



वनडे वर्ल्डकप पात्रता स्पर्धा

## झिम्बाब्वेची नेपाळवर मात; अमेरिकेने विंडीजला रडवले

**हरारे : वृत्तसंस्था**

भारतात होणाऱ्या वन डे वर्ल्डकप स्पर्धेसाठीच्या उर्वरित दोन स्थानांसाठी सुरू झालेल्या पात्रता स्पर्धेत झिम्बाब्वेने पहिल्याच सामन्यात विजय साकारला. दुसरीकडे माजी विजेत्या वेस्ट इंडिजला नव्या दमाच्या अमेरिकन संघाने रडकुंडीला आणले.




नेपाळच्या कुशल भुर्तेल आणि आसीफ शेख यांनी झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची धुलाई केली. कुशलने ९५ चेंडूंत १३ चौकार व दोन षटकार खेचून ९९ धावांची खेळी केली. अवघ्या एका धावेने कुशलचे शतक हुकले. आसीफने १०० चेंडूंत ६६ धावांची खेळी करून कुशलसह पहिल्या विकेटसाठी १७१ धावांची विक्रमी भागीदारी केली, पण या दोघांच्या विकेटनंतर नेपाळचा डाव गडगडला. कुशल मल्ला (४१) व कर्णधार रोहित पौडेल (३१) यांनी चांगली खेळी करून संघाला ८ बाद २९० धावांपर्यंत पोहचवले. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेकडून दोन अनुभवी खेळाडू जबरदस्त खेळले. एर्व्हिनने १२८ चेंडूंत नाबाद १२१ धावा केल्या, तर विलियम्सने ७० चेंडूंत नाबाद १०२ धावा करून तिसऱ्या विकेटसाठी १६४ धावांची भागीदारी केली. विलियम्सने झिम्बाब्वेकडून सर्वांत वेगवान शतक झळकावले. अखेर झिम्बाब्वेने ४४.१ षटकांत २ बाद २९१ धावा करून विजय मिळवला.

मुख्य फेरीत प्रवेश करण्याच्या शर्यतीत आघाडीवर असलेल्या माजी विजेत्या वेस्ट इंडिज संघाला पहिल्याच सामन्यात कडवी टक्कर मिळली. अमेरिकेविरुद्धची ही लढत वेस्ट इंडिजने ३९ धावांनी जिंकली, परंतु अमेरिकेच्या गजानंद सिंगने शतक झळकावून सर्वांची मने जिंकली. वेस्ट इंडिजला ५० षटकेही पूर्ण खेळता आली नाहीत आणि त्यांचा संपूर्ण संघ २९७ धावांत तंबूत परतला. जॉन्सन चार्ल्स (६६), कर्णधार शे होप (५४), निकोलस पूरन (४३), रोस्टन चेस (५५) व जेसन होल्डर (५६) यांनी चांगली खेळी केली.

अमेरिकेच्या सौरभ नेत्रावळकर (३-५३), कायले फिलिप (३-५६) व स्टीव्हन टेलर (३-५३) यांनी विंडीजची कोंडी केली. प्रत्युत्तरात अमेरिकेच्या गजानंदने १०९ चेंडूंत नाबाद १०१ धावा केल्या. शायन जहांगिर (३९) व नोस्थुश केंजिगे (३४) हे वगळता अन्य फलंदाजांना अपयश आले. त्यांना ५० षटकांत ७ बाद २५८ धावाच करता आल्या.

## लांब उडीपटू मुरली श्रीशंकर जागतिक स्पर्धेसाठी पात्र

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**



आघाडीचा लांब उडीपटू मुरली श्रीशंकरने राष्ट्रीय आंतरराज्य अजिंक्यपद अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेतील पहिल्याच प्रयत्नात ८.४१ मीटरचे अंतर गाठताना जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. २४ वर्षीय श्रीशंकरला राष्ट्रीय विक्रमाने मात्र हुलकावणी दिली, परंतु त्याला सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी करण्यात यश आले.

श्रीशंकरसह १२ खेळाडूंनी लांब उडीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. पात्रता फेरीत अल्डरिनने ७.८३ मीटर अंतरासह दुसरे, तर मुहम्मद अनीस याहियाने ७.७१ मीटर अंतरासह तिसरे स्थान मिळवले. आशियाई क्रीडा स्पर्धेकरिता पात्र ठरण्यासाठी ७.९५ मीटर हे अंतर ठेवण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी श्रीशंकरने डायमंड लीगमध्ये कांस्यपदक मिळवले होते आणि या स्पर्धेत पदक जिंकणारा तो भालाफेकपटू नीरज चोप्रा व माजी थाळीफेकपटू विकास गौडानंतर तिसरा भारतीय खेळाडू ठरला होता.

महिलांच्या लांब उडीमध्ये केरळच्या अ‍ॅन्सी सोजनने आशियाई क्रीडा स्पर्धा पात्रतेसाठीचे ६.४५ मीटरचे अंतर पार करताना अंतिम फेरी गाठली. तिने ६.४९ मीटर लांब उडी मारली. पात्रता फेरीत केरळचीच नयना जेम्स (६.३१ मीटर) दुसऱ्या, तर उत्तर प्रदेशचे प्रतिनिधित्व करणारी शैली सिंह (६.२७ मीटर) तिसऱ्या स्थानी राहिली.

## तिरंदाजीत अभिषेक वर्माचा 'सुवर्ण'वेध



**मेडेलिन : वृत्तसंस्था**

कोलंबियातील विश्वचषक तिरंदाजीच्या तिसऱ्या टप्प्यातील स्पर्धेत पुरुषांच्या कंपाऊंड वैयक्तिक गटात भारताच्या अभिषेक वर्माने सुवर्णपदक पटकाविले. २०१४च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत कंपाऊंड सांघिक स्पर्धेत सुवर्ण आणि वैयक्तिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकण्याची कामगिरी करणाऱ्या अभिषेकने अंतिम फेरीत अमेरिकेच्या जेम्स लुट्जला १४८-१४६ अशा फरकाने पराभूत केले.

विश्वचषक स्पर्धामध्ये यापूर्वी दोन वेळा सुवर्ण कामगिरी करणाऱ्या अभिषेकने यंदा विश्वचषकाच्या पहिल्या दोन टप्प्यांतील स्पर्धेत सहभाग नोंदवला नव्हता. तिसऱ्या टप्प्यातील स्पर्धेत त्याने पुनरागमन करताना उत्कृष्ट कामगिरी केली.

अभिषेक वर्माचे विश्वचषक स्पर्धेतील हे तिसरे वैयक्तिक सुवर्णपदक आहे. यापूर्वी त्याने २०१५मध्ये पोलंडच्या रॉक्लॉ आणि २०२१मध्ये पॅरिस येथे झालेल्या स्पर्धेत सोनेरी यश संपादन केले होते.

## इंटरकॉन्टिनेंटल चषक फुटबॉल स्पर्धेचे भारताला विजेतेपद



**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

कर्णधार सुनील छेत्री आणि लिल्लजुआला छांगते यांनी झळकावलेल्या गोलच्या बळावर भारताने अंतिम सामन्यात लेबननला २-० असे नमवत इंटरकॉन्टिनेंटल चषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले.

सामन्याच्या पहिल्या सत्रात दोन्ही संघांच्या आक्रमणाला फारशी धार नव्हती. त्यामुळे मध्यंतरापर्यंत गोलशून्य बरोबरी होती. यानंतर ४६व्या मिनिटाला छेत्रीने गोल करीत भारताला आघाडी मिळवून दिली. हा त्याचा ८७वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला. सर्वाधिक आंतरराष्ट्रीय गोल करणाऱ्या सक्रिय खेळाडूंमध्ये तो तिसऱ्या स्थानी आहे. या गोलसाठी साहाय्य (असिस्ट) करणाऱ्या छांगतेने ६६व्या मिनिटाला गोल झळकावत भारताची आघाडी दुप्पट केली.

बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या नाओरेम सिंहने छेत्रीच्या पासवर गोल करण्याचा प्रयत्न केला, मात्र, लेबननच्या गोलरक्षकाने त्याचा प्रयत्न हाणून पाडला, परंतु भारताने अखेपर्यंत आघाडी राखताना विजय नोंदवला. जागतिक क्रमवारीत १०१व्या स्थानी असलेल्या भारताने दुसऱ्यांदा स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे.

दरम्यान, ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी इंटरकॉन्टिनेंटल चषकचे विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय पुरुष फुटबॉल संघासाठी एक कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.

## ऐतिहासिक विजेतेपदाबद्दल सात्त्विक-चिरागवर अभिनंदनाचा वर्षाव

**जकार्ता : वृत्तसंस्था**

सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारताच्या तारांकित जोडीने आपल्या कामगिरीचा चढता आलेख कायम राखताना रविवारी इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष दुहेरीचे विजेतेपद मिळवण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. सुपर १००० दर्जा प्राप्त स्पर्धेचे विजेतेपद मिळवणारी ही पहिली भारतीय जोडी ठरली.

जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानी असलेल्या सात्त्विक-चिराग जोडीने अंतिम सामन्यात मलेशियाच्या आरोन चिया व सोह वूई यिक या जागतिक विजेत्या जोडीला २१-१७, २१-१८ असे सरळ गेममध्ये पराभूत करीत प्रथमच सुपर १००० दर्जा असणारी स्पर्धा जिंकली. दोन्ही जोड्यांमध्ये सामन्याच्या



सुरुवातीपासूनच चांगली चुरस पाहायला मिळाली. सात्त्विक-चिराग जोडीने पहिल्या गेममध्ये ११-९ अशी आघाडी घेतली आणि आपल्या कामगिरीत सातत्य राखताना पहिला गेम २१-१७ असा जिंकला. भारतीय जोडीने मलेशियाच्या जोडीला सहजासहजी गुण मिळवू दिले नाहीत. दुसरा गेम एक वेळ ६-६ असा बरोबरीत होता. त्यानंतर भारतीय जोडीने जोरदार खेळ करताना १८-११ अशी आघाडी घेतली. मग मलेशियन जोडीनेही पुनरागमन करत भारतीय जोडीची आघाडी २०-१८ अशी कमी केली, मात्र सात्त्विक-चिराग जोडीने पुढील निर्णायक गुण मिळवत गेमसह सामना जिंकला.

बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्ण आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक मिळवणाऱ्या सात्त्विक-चिराग जोडीने आपल्या कारकीर्दीत नऊ प्रयत्नांत प्रथमच दुसऱ्या मानांकित चिया व यिक या मलेशियन जोडीला नमवले. यासह इंडोनेशिया बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद मिळवणारी सात्त्विक-चिराग पहिली भारतीय जोडी ठरली. यापूर्वी सायना नेहवाल (२०१० व २०१२) आणि किदम्बी श्रीकांत (२०१७) यांनी एकेरीत जेतेपद मिळवले होते.



## अजिंक्य काऊंटी क्रिकेट खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे १८ महिन्यांनंतर भारताच्या कसोटी संघात परतला. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये अजिंक्य भारतासाठी एक महत्त्वाचा फलंदाज घोषित झाला, पण अजिंक्य आता वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर इंग्लंडमध्ये क्रिकेट खेळण्यासाठी जाणार आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर अजिंक्य रहाणे लगेचच इंग्लंडला रवाना होणार आहे. अजिंक्य इंग्लिश काऊंटी संघ लीसेस्टरशायरकडून डिव्हिजन दोनमध्ये खेळणार आहे. भारताचा माजी कर्णधार अजिंक्यने या महिन्याच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसह भारतीय संघात यशस्वी पुनरागमन केले. अजिंक्य दुसऱ्यांदा काऊंटी क्रिकेट खेळताना दिसणार आहे. याआधी २०१९च्या हंगामात तो हॅम्पशायरकडून खेळला होता






## वर्ल्डकपपूर्वी बुमराह संघात परतणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे गेल्या वर्षी सप्टेंबरपासून क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. आता त्याच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. बुमराह लवकरच मैदानात पुनरागमन करणार आहे.

बुमराहने टीम इंडियासाठी शेवटचा सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर खेळला होता. त्यानंतर त्याच्या पाठीच्या दुखण्याने त्याला प्रचंड त्रास दिला आणि भारतीय संघालाही याचा फटका बसला. बुमराह टी-२० विश्वचषक, आशिया चषक, आयपीएल २०२३ आणि आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३चा अंतिम सामनाही खेळू शकला नाही.

वृत्तानुसार जसप्रीत बुमराह ऑगस्टमध्ये खेळल्या जाणाऱ्या आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत पुनरागमन करू शकतो. आशिया चषक आणि विश्वचषकापूर्वी भारतासाठी हे चांगले संकेत आहेत. आयर्लंड मालिकेनंतरच ३१ ऑगस्टपासून आशिया कपला सुरुवात होणार आहे. बुमराहच्या पाठीवर मार्चमध्ये शस्त्रक्रिया झाली होती. तेव्हापासून तो बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये आपल्या फिटनेसवर काम करत असून झपाट्याने बराही होत आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com